Registered No. B. 1.

THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 30TH JUNE 1898.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

## हिंदुस्थान सरकार.

### लेजिस्लेटिव्ह डिपार्टमेंट.

हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट आली जनाब गव्हर्नर जनरल यांनीं तारीख २२ माहे मार्च सन १८९८ रोजीं मंजूर केला, तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं यावरून प्रसिद्ध केला असे :—

### सन १८९८ चा आक्ट ६ वा.

सन १८९८ चा हिंदुस्थानचा पोस्ट आफिस आक्ट.

### अनुक्रमणिका.

बाब १.

प्रारंभींचे नियम.

कलमें.

१. लहान सरनामा, व्याप्ति, लागू होणें व सुरुवात.

२. व्याख्या.

३. "टपालांतून जात असतांना" व "स्वाधीन करणें" यांचा अर्थ.

बाब २.

सरकारचा अधिकार व संरक्षण.

कलमें.

४. पत्रें नेण्याचा अनन्यग्रहाधिकार सरकाराकडे राखून ठेविला आहे.

५. कित्येक मनुष्यांस पत्रें नेण्याची स्पष्टपणें मनाई केली आहे.

६. जिन्नस नाहींशी झाली किंवा स्वाधीन करण्यांत चूक झाली किंवा तिला विलंब लागला किंवा

कलमें.

नुकसान झालें, तर त्याबद्दलच्या जबाबदारींतून मोकळीक.

## भाग ३.

### टपाल हाशील.

७. देशांतील टपाल हाशिलाचे दर ठरविण्याचा अधिकार.

८. कित्येक बाबतींत टपाल हाशील व फी देण्याबाबद कानू करण्याचा अधिकार.

९. रजिस्टर करावयाच्या वर्तमानपत्रांबाबद कानू करण्याचा अधिकार.

१०. परदेशी टपाल हाशिलाचे दर ठरविण्याचा अधिकार.

११. टपाल हाशील देण्याबद्दलची जबाबदारी.

१२. टपालाच्या जिनसांबाबद येणें असलेलें टपाल हाशील व इतर रकमा वसूल करणें.

१३. पोस्ट आफिसानें दिलेली कस्टमची ड्यूटी टपाल हाशिलाप्रमाणें वसूल करतां येईल.

१४. पोस्ट आफिसच्या निशाण्या, दर्शविलेल्या कित्येक गोष्टींच्या प्रथमदर्शनी पुराव्यादाखल आहेत.

१५. आफिसची निशाणी, टपाल हाशिलाच्या रकमेच्या पुराव्यादाखल आहे.

## भाग ४.

### टपाल हाशिलाचे स्टांप.

१६. टपाल हाशिलाच्या स्टांपांची योजना व त्यांबाबद कानू करण्याचा अधिकार.

१७. टपाल हाशिलाचे स्टांप हे महसुलाच्या कारणाकरितां स्टांप आहेत असें समजणें.

## भाग ५.

### टपालाच्या जिनसा पाठविण्याच्या शर्ती.

१८. टपालाची जिनस टपालांतून जात असतांना पाठविणाराच्या परत स्वाधीन करणें.

१९. कोणतीही अपायकारक वस्तु टपालानें पाठविण्याची मनाई आहे.

२०. कोणतीही विचकट वगैरे वस्तु टपालानें पाठविण्याची मनाई आहे.

कलमें.

२१. टपालाच्या जिनसा टपालानें पाठविण्याबाबद कानू करण्याचा अधिकार.

२२. कित्येक टपालाच्या जिनसा रवाना करण्याचें किंवा स्वाधीन करण्याचें तहकूब ठेवण्याचा अधिकार.

२३. आक्टाविरुद्ध टपालांत घातलेल्या टपालाच्या जिनसांची व्यवस्था करण्याचा अधिकार.

२४. मनाईचा किंवा ड्यूटीस पात्र असणारा माल ज्या टपालाच्या जिनसांमध्यें असेल त्यांची व्यवस्था करण्याचा अधिकार.

२५. ज्याबद्दल जाहिरनामा प्रसिद्ध झाला असेल असा माल टपालांतून जात असतांना थांबविण्याचा अधिकार.

२६. सार्वजनिक कल्याणाकरितां टपालाच्या जिनसा थांबविण्याचा अधिकार.

२७. परमुलुखांतून आलेल्या ज्या टपालाच्या जिनसांला खोटे किंवा पूर्वी उपयोग केलेले स्टांप असतील त्यांची व्यवस्था करण्याचा अधिकार.

## भाग ६.

### रजिस्टर करणें, विमा उतरणें, व व्ह्याल्यूपेएबल पोस्ट यांबाबद.

२८. टपालाच्या जिनसा रजिस्टर करणें.

२९. रजिस्टर करण्याबाबद कानू करण्याचा अधिकार.

३०. टपालाच्या जिनसांचा विमा उतरणें.

३१. टपालाच्या जिनसांचा विमा उतरण्याविषयीं फर्माविण्याचा अधिकार.

३२. विम्याबाबद कानू करण्याचा अधिकार.

३३. विमा उतरलेल्या टपालाच्या जिनसांबाबद जबाबदारी.

३४. व्ह्याल्यूपेएबल टपालाच्या जिनसा टपालानें पाठविणें.

३५. व्ह्याल्यू-पेएबल टपालाच्या जिनसांबाबद कानू करण्याचा अधिकार.

३६. इतर देशांशीं असणारी व्यवस्था अमलांत आणण्याचा अधिकार.

कलमें.

## बाब ७.

### न स्वाधीन केलेल्या टपालाच्या जिनसा.

३७. न स्वाधीन केलेल्या टपालाच्या जिनसांची व्यवस्था करण्याबाबद कानू करण्याचा अधिकार.

३८. पोस्ट मास्तर जनरलच्या आफिसांतील न स्वाधीन केलेल्या टपालाच्या जिनसांची व्यवस्था.

३९. न स्वाधीन केलेल्या टपालाच्या जिनसांची अखेरची व्यवस्था.

---

## बाब ८.

### तारवानें न्यावयाच्या पत्रांबाबद.

४०. ब्रिटिश हिंदुस्थानांतील कोणत्याहि बंदराहून निघणाऱ्या व मेलचें तारूं नसणाऱ्या तारवाच्या मास्तराचें मेलच्या थैल्या नेणें हें काम आहे.

४१. ब्रिटिश हिंदुस्थानांतील कोणत्याही बंदरीं येऊन पोंचलेल्या तारवाच्या मास्तराचें, त्या तारवावर असलेल्या टपालाच्या जिनसा व मेलच्या थैल्या यासंबंधानें काम.

४२. मेलच्या तारवांखेरीज इतर तारवांना टपालाच्या जिनसा नेण्याबद्दल इनामाचा पैका देणें.

---

## बाब ९.

### मनी आर्डरी.

४३. मनी आर्डरींसाठीं तजवीज करण्यास व त्यांच्याद्वारें पैका पाठविण्यासंबंधानें कानू करण्यास अधिकार.

४४. मनी आर्डर परत मागविण्यास किंवा पैका द्यावयाचा त्याच्या नांवाच्याबदला दुसऱ्या कोणाचें नांव दाखल करण्यास, पैका पाठविणारास अधिकार.

४५. पोस्टल आर्डरी करण्याबद्दल तजवीज करण्याचा अधिकार.

४६ इतर देशांशीं असणारी व्यवस्था अमलांत आणण्यास अधिकार.

४७. भलत्याच मनुष्यास दिलेल्या मनी आर्डरीच्या रकमेचा वसूल.

४८. मनी आर्डरींसंबंधाच्या जबाबदारींतून मुक्तता.

कलमें.

## बाब १०.

### शिक्षा व काम चालविण्याची रीत.

### पोस्ट आफिसच्या अमलदारांनीं केलेले अपराध.

४९. मेलच्या थैल्या किंवा टपालाच्या जिनसा नेण्याकरितां किंवा स्वाधीन करण्याकरितां लावलेल्या मनुष्याच्या गैरवर्तनाबद्दल शिक्षा.

५०. मेलच्या थैल्या किंवा टपालाच्या जिनसा नेण्याकरितां किंवा स्वाधीन करण्याकरितां लावलेल्या मनुष्यानें परवानगीशिवाय किंवा नोटीस दिल्याशिवाय आपखुशीनें कामावरून दूर होण्याबद्दल शिक्षा.

५१. टपालाच्या जिनसा नेण्याकरितां किंवा स्वाधीन करण्याकरितां लावलेल्या मनुष्यानें ठेवलेल्या रजिस्टरांत खोटी नोंद करण्याबद्दल शिक्षा.

५२. टपालाच्या जिनसा चोरणें, त्यांचा अप्रामाणिकपणानें गैरशिस्त उपयोग करणें, त्या छपविणें, त्यांचा नाश करणें किंवा त्या फेकून देणें याबद्दल शिक्षा.

५३. टपालाच्या जिनसा उघडण्याबद्दल, अटकावण्याबद्दल किंवा खोळंबवण्याबद्दल शिक्षा.

५४. आफिसच्या निशाण्यांच्या संबंधानें कपट करण्याबद्दल व फाजील टपाल हाशील घेण्याबद्दल शिक्षा.

५५. पोस्ट आफिसचे दस्तऐवज कपटानें तयार करण्याबद्दल, फिरविण्याबद्दल किंवा छपविण्याबद्दल किंवा त्यांचा नाश करण्याबद्दल शिक्षा.

५६. हाशील न भरलेल्या टपालाच्या जिनसा कपटानें पाठविण्याबद्दल शिक्षा.

५७. हिंदुस्थानांतपण ब्रिटिश हिंदुस्थानाबाहेर केलेल्या अपराधांबद्दल शिक्षा.

### इतर अपराध.

५८. कलम ४ याविरुद्ध चालल्याबद्दल शिक्षा.

५९. कलम ५ याविरुद्ध चालल्याबद्दल शिक्षा.

६०. कलम १६ याअन्वयें केलेल्या कानूंचा भंग केल्याबद्दल शिक्षा.

६१. कलम १९ अगर २० याविरुद्ध चालण्याबद्दल शिक्षा.

६२. पत्रांच्या पेट्या खराब किंवा जायां करण्याबद्दल शिक्षा.

कलमें.

६३. पोस्ट आफिसला किंवा पोस्ट आफिसच्या पत्रांच्या पेटीला अधिकारावांचून कोणतीहि वस्तू किंवा रंग किंवा डांबर लावणें किंवा तें आफिस किंवा ती पेटी विरूप करणें याबद्दल शिक्षा.

६४. खोटा इकरार करण्याबद्दल शिक्षा.

६५. कलम ४० अगर ४१ याच्या ठरावांप्रमाणें वागण्यास चुकल्याबद्दल तारवाच्या मास्तरास शिक्षा.

६६. बंदरांत येऊन पोंहचलेल्या तारवावर पत्रें मागें ठेवल्याबद्दल शिक्षा.

६७ मेल अटकावून ठेवण्याबद्दल किंवा मेलची थैली उघडण्याबद्दल शिक्षा.

६८. चुकीनें देण्यांत आलेल्या टपालाच्या जिनसा किंवा मेलच्या थैल्या ठेऊन घेण्याबद्दल शिक्षा.

६९. पत्रांवर ज्यांचा पत्ता लिहिला असेल त्यांस तीं न पोंहचत असें बेकायदेशीर रीतीनें करण्याबद्दल शिक्षा.

सामान्य.

७०. ह्या आक्टाखालील अपराध करण्याच्या कामीं साह्य करण्याबद्दल किंवा ते अपराध करण्याचा प्रयत्न करण्याबद्दल शिक्षा.

कलमें.

७१ अपराधाच्या खटल्यांत, स्वामित्व पोस्ट आफिसचें आहे ह्मणून दाखल करावें.

७२. ह्या आक्टाच्या कित्येक कलमांअन्वयें फिर्याद करण्याचा अधिकार.

बाब ११.

पुरवणीचे ठराव.

७३. जमीनदारी व इतर डिस्ट्रिक्ट पोस्टें.

७४. ह्या आक्टाखालील कानूसंबंधानें कानू व ठराव करण्यास सामान्य अधिकार.

७५. कानू करण्याचा अधिकार शिवाय करून इतर अधिकार डायरेक्टर जनरल याकडे सोंपविण्याचा अधिकार.

७६. रद्द करणें.

७७. बचाव.

पहिलें परिशिष्ट—देशांतील टपालहाशिलाचे दर.

दुसरें परिशिष्ट.—कायदे रद्द केले ते.

## हिंदुस्थानांतील *पोस्ट-आफिससंबंधी कायदा एकत्र करून सुधारण्याबाबद आक्ट.

ज्याअर्थी हिंदुस्थानांतील पोस्ट-आफिससंबंधी कायदा एकत्र करून सुधारणे योग्य आहे, त्याअर्थी यावरून खालीलप्रमाणें ठरविण्यांत येत आहे:—

### बाब १.

प्रारंभींचे नियम.

संक्षिप्त सरनामा, व्याप्ति, लागू होणें व सुरुवात.

१. (१) या आक्टास, सन १८९८ चा हिंदुस्थानचा पोस्ट आफिस आक्ट असें ह्मणावें.

(२) तो, उत्तर ब्रह्मदेश, ब्रिटिश बलुचिस्थान, सांतल पर्गणे व स्पिटी पर्गणा यांसुद्धा, सगळ्या ब्रिटिश हिंदुस्थानास लागू आहे; आणि तो—

(अ) ब्रिटिश हिंदुस्थानाच्या बाहेरील व पलीकडील कोणत्याही जागेंतली मलिका माआझमांची हिंदुस्थानांतील सर्व देशी रयत,

(ब) हिंदुस्थानांतील कोणत्याहि देशी राजाच्या किंवा रजवाड्याच्या मुलुकांमधली इतर सर्व ब्रिटिश रयत, आणि

(क) हिंदुस्थानांतील कोणत्याहि देशी राजाच्या किंवा रजवाड्याच्या मुलुकांमधले राणीसाहेबांचे सर्व नौकर, मग ते ब्रिटिश रयत असोत किंवा नसोत,

यांसही लागू होतो.

(३) तो सन १८९८ च्या जुलै महिन्याच्या पहिल्या तारिखेस अमलांत येईल.

*पोस्ट=टपाल.

२. या आक्टांत, विषयावरून किंवा संदर्भावरून बाध येत नसेल तर,— व्याख्या.

(अ) "डायरेक्टर जनरल" या शब्दांचा अर्थ, हिंदुस्थानच्या पोस्ट आफिसचा डायरेक्टर जनरल असा होतो:

(ब) "देशांतील" या शब्दाचा उपयोग टपालाच्या जिनसेच्या संबंधानें केला असेल तेथें त्याचा अर्थ—

(१) ब्रिटिश हिंदुस्थानांत टपालांत घातलेली आणि ब्रिटिश हिंदुस्थानांतील कोणत्याही जागेचा किंवा गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं ब्रिटिश हिंदुस्थानाच्या हद्दींपलीकडे ज्या कोणत्याहि जागेकरितां पोस्ट आफिस स्थापलें असेल त्या जागेचा जिजवर पत्ता असेल अशी, किंवा

(२) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं ब्रिटिश हिंदुस्थानाच्या हद्दींपलीकडे स्थापलेल्या कोणत्याहि पोस्ट आफिसांत घातलेली आणि ज्या कोणत्याहि जागेकरितां असें कोणतेंही पोस्ट आफिस स्थापलेलें असेल त्या जागेचा किंवा ब्रिटिश हिंदुस्थानांतील कोणत्याही जागेचा जिजवर पत्ता असेल अशी,

असा होतो:

(क) "मेलची थैली" या शब्दांमध्यें, ज्या थैलींतून, पेटींतून, पार्सलांतून, लाखोट्यांतून किंवा दुसऱ्या कोणत्याही वेष्टनांतून टपालाच्या जिनसा टपालांतून जात असतांना नेण्यांत येतात, त्या थैलीचा, पेटीचा, पार्सलाचा, लाखोट्याचा किंवा दुसऱ्या कोणत्याही वेष्टनाचा समावेश होतो, मग त्यांमध्यें अशी कोणतीही जिन्नस असो किंवा नसो :

(ड) "मेलचें तारूं" या शब्दांचा अर्थ, हिंदुस्थान सरकारनें किंवा मल्लिका माआझमांच्या सरकारानें किंवा ब्रिटिश अमलाखालील कोणत्याही मुलकाच्या सरकारानें किंवा परदेशाच्या सरकारानें मेल नेण्याच्या कामीं कराराअन्वयें किंवा चालू असणाऱ्या व्यवस्थेअन्वयें लावलेलें तारूं असा होतो:

(इ) "पोस्ट आफिसचा अमलदार" या शब्दांमध्यें, पोस्ट आफिसच्या कोणत्याही कामामध्यें किंवा पोस्ट-आफिसच्यावतीनें लावलेल्या कोणत्याही मनुष्याचा समावेश होतो:

(फ) "टपाल हाशील" या शब्दांचा अर्थ, टपालाच्या जिनसा टपालानें पाठविण्याकरितां पडणारी ड्यूटी असा होतो :

(ग) "टपाल हाशिलाचा स्टांप" या शब्दांचा अर्थ, टपालाच्या जिनसांबाबद या आक्टाअन्वयें द्यावयाचें टपाल हाशील किंवा दुसऱ्या फी किंवा रकमा दर्शविण्याकरितां गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं ज्या कोणत्याही स्टांपाची योजना केली असेल तो स्टांप असा होतो, आणि त्यामध्यें चिकटणाऱ्या टपाल हाशिलाच्या स्टांपांचा आणि कोणत्याहि लाखोट्यावर, वेष्टनावर, पोस्टकार्डावर किंवा दुसऱ्या जिनसेवर छापलेल्या, उठवलेल्या, वठवलेल्या किंवा इतर रीतीनें दर्शविलेल्या स्टांपांचा समावेश होतो :

(ह) "पोस्ट आफिस" या शब्दांमध्यें, पोस्ट आफिसच्या कारणांकरितां उपयोग केलेल्या दरेक घराचा, इमारतीचा, खोलीचा, गाडीचा किंवा जागेचा, आणि टपालाच्या जिनसा घालण्यासाठीं पोस्ट आफिसानें ज्या कोणत्याही पत्रांच्या पेटीची योजना केली असेल त्या दरेक पेटीचा समावेश होतो :

(आय्) "टपालाची जिन्नस" या शब्दांमध्यें, पत्र, पोष्टकार्ड, वर्तमानपत्र, बुकाचें किंवा नमुन्याचें प्याकेट, पार्सल, आणि टपालानें नेण्याजोगी दरेक जिन्नस किंवा वस्तु यांचा समावेश होतोः

(ज) "पोस्ट मास्तर जनरल" या शब्दांमध्यें, डेप्युटी पोस्ट मास्तर जनरलचा किंवा पोस्ट मास्तर जनरल याचे अधिकार चालविणाऱ्या दुसऱ्या अमलदाराचा समावेश होतोः आणि

(के) "पोस्ट आफिस" या शब्दांचा अर्थ डायरेक्टर जनरलच्या अधिकाराखालील खातें असा होतो.

"टपालांतून जात असतांना" व "स्वाधीन कर"चा अर्थ.

३. या आक्टाच्या कारणांकरितां,—

(अ) टपालाची जिन्नस पोस्ट आफिसच्या स्वाधीन केल्या वेळापासून तों तिजवर ज्या मनुष्याचा पत्ता असेल त्याच्या ती स्वाधीन केली जाई तोंपर्यंत किंवा ७ व्या बाबीअन्वयें पाठविणारास ती परत देण्यांत किंवा इतर रीतीनें तिची व्यवस्था करण्यांत येई तोंपर्यंत ती टपालांतून जात आहे असें समजलें पाहिजेः

(ब) कोणत्याही प्रकारची टपालाची जिन्नस, पोस्टमनच्या किंवा टपालाकरितां त्या प्रकारच्या टपालाच्या जिनसा घेण्याचा अधिकार असलेल्या दुसऱ्या मनुष्याच्या स्वाधीन केली ह्मणजे ती पोस्ट आफिसच्या स्वाधीन केली असें समजलें पाहिजेः आणि

(क) टपालाच्या जिनसेवर ज्या मनुष्याचा पत्ता असेल त्याच्या घरीं किंवा कचेरींत ती स्वाधीन केली, किंवा त्या मनुष्याच्या किंवा त्याचा नोकर किंवा एजंट याच्या किंवा टपालाच्या जिनसा त्या मनुष्याच्या स्वाधीन करण्याच्या नेहमींच्या रीतीप्रमाणें ती जिन्नस घेण्याचा ज्या दुसऱ्या मनुष्यास अधिकार आहे असें वाटेल त्याच्या स्वाधीन केली ह्मणजे ती तिजवर ज्याचा पत्ता असेल त्याच्या स्वाधीन केली असें समजलें पाहिजे.

---

## बाब २.

### सरकारचा अधिकार व संरक्षण.

पत्रें नेण्याचा अनन्यग्राह्याधिकार सरकाराकडे राखून ठेविलेला आहे.

४. (१) ब्रिटिश हिंदुस्थानामध्यें जेथें जेथें गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं पोस्टें स्थापिलीं असतील किंवा टपालाची सोई केली असेल, तेथें तेथें, खालील पत्रें खेरीज करून, इतर सर्व पत्रें एका जागेहून दुसऱ्या जागीं टपालानें नेण्याचा अनन्यग्राह्याधिकार गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस असेल, आणि तसेंच, खालील पत्रें खेरीज करून, इतर सर्व पत्रें घेणें, गोळा करणें, पाठविणें, रवाना करणें, व स्वाधीन करणें हीं सर्व आनुषंगिक कामें करण्याचाही अनन्यग्राह्याधिकार त्यांस असेल. खेरीज केलेलीं पत्रें येणेंप्रमाणेंः—

(अ) जीं पत्रें एकादा खासगी मित्र वाटेनें जात असतांना किंवा मुशाफरीस किंवा प्रवासास जात असतांना त्याबरोबर पाठविलेलीं असून जीं त्यानें, त्यांवर ज्या मनुष्याचा पत्ता असेल त्याच्या, तीं घेण्याबदल, नेण्याबदल किंवा स्वाधीन करण्याबदल मजुरी किंवा बक्षीस घेतल्यावांचून किंवा दुसरा नफा किंवा फायदा करून घेतल्यावांचून द्यावयाचीं असतील, तीं पत्रें :

(व) जीं पत्रें, केवळ तीं पाठविणाराच्या किंवा घेणाराच्या कामकाजासंबंधीं असून, जीं मुद्दाम जासुदाबरोबर पाठविलेलीं असतील, तीं पत्रें ; आणि

(क) जीं पत्रें केवळ मालासंबंधीं किंवा मिळकतीसंबंधींच असून, जीं जलमार्गानें किंवा जमिनीवरून पाठविलेलीं असतील व जीं, ज्या मालासंबंधी किंवा मिळकतीसंबंधी तीं असतील त्या मालाबरोबर किंवा मिळकतीबरोबर, तीं घेण्याबद्दल, नेण्याबद्दल, किंवा स्वाधीन करण्याबद्दल मजुरी किंवा बक्षीस घेतल्यावांचून किंवा दुसरा नफा किंवा फायदा करून घेतल्यावांचून, स्वाधीन करावयाचीं असतील, तीं पत्रें:

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, या कलमांतील कोणत्याहि मजकुरावरून कोणत्याही मनुष्यास, सदरीं सांगितल्याप्रमाणें खेरीज केलेलीं पत्रें, टपालाखेरीज इतर रीतीनें पाठविण्याकरितां, गोळा करण्याचा अधिकार प्राप्त होतो असें समजूं नये.

( २ ) या कलमाच्या व ५ व्या कलमाच्या कारणांकरितां "पत्रें" या शब्दांत पोस्टकार्डांचा समावेश होतो.

५. ब्रिटिश हिंदुस्थानामध्यें जेथें जेथें गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं पोस्टें स्थापिलीं असतील किंवा टपालाची सोई केली असेल तेथें तेथें खालील मनुष्यांस, पत्रें गोळा करण्याची, नेण्याची, देण्यास काढण्याची किंवा स्वाधीन करण्याची किंवा तीं नेण्याकरितां किंवा स्वाधीन करण्याकरितां घेण्याची मनाई, त्यांनीं असें करण्याबद्दल मजुरी किंवा बक्षीस न घेतलें किंवा दुसरा नफा किंवा फायदा करून न घेतला तथापि, स्पष्टपणें केलेली आहे. तीं मनुष्यें येणेंप्रमाणें:— कित्येक मनुष्यांस पत्रें नेण्याची स्पष्टपणें मनाई केली आहे.

(अ) उतारू नेणारीं किंवा माल नेणारीं सामान्य मनुष्यें, आणि त्यांचे नोकर किंवा एजंटः मात्र जीं पत्रें केवळ त्यांच्या गाड्यांतील मालासंबंधीच असतील त्यांस सदरहू मनाई लागू नाहीं ; आणि

(ब) ब्रिटिश हिंदुस्थानांतील कोणत्याहा नदांतून किंवा कालव्यांतून, किंवा ब्रिटिश हिंदुस्थानांतील कोणत्याही बंदरांच्या किंवा जागांच्या दर्म्यान, हंकारून जाणाऱ्या किंवा जाणाऱ्या जहाजांचे मालक व मास्तर, आणि त्यांचे नोकर किंवा एजंटः मात्र जीं पत्रें केवळ त्या जहाजांवरील मालासंबंधींच असतील त्यांस, व ज्या टपालाच्या जिनसा ८ व्या बाबीअन्वयें नेण्याकरितां घेतल्या असतील त्यांस सदरहू मनाई लागू नाहीं.

६. कोणतीही टपालाची जिन्नस टपालांतून जात असतांना नाहींशी झाली किंवा स्वाधीन करण्यांत चूक झाली किंवा तिला विलंब लागला किंवा नुकसान झालें या कारणानें कोणतीही जबाबदारी, यांत पुढें ठरविल्याप्रमाणें गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं स्पष्ट अक्षरांनीं जेथवर अशी जबाबदारी घेण्याचें पतकरिलें असेल ती शिवाय करून, सेक्रेटरी ऑफ् स्टेट फॉर इंडिया इन् कौन्सिल यांवर येणार नाहीं ; आणि अशी कोणतीही जिन्नस नाहींशी झाली किंवा स्वाधीन करण्यांत चूक झाली किंवा तिला विलंब लागला किंवा नुकसान झालें या कारणानें कोणतीही जबाबदारी पोस्ट आफिसच्या कोणत्याही अमलदारावर, त्यानें ती गोष्ट कपटानें किंवा बुद्धिपूर्वक केलेल्या आपल्या कृत्यानें किंवा कसुरीनें होऊं दिलेली नसेल तर येणार नाहीं. जिन्नस नाहींशी झाली किंवा स्वाधीन करण्यांत चूक झाली किंवा तिला विलंब लागला किंवा नुकसान झालें, तर त्याबद्दलच्या जबाबदारींतून मोकळीक.

———

## बाब ३.

### टपाल हाशील.

देशांतील टपाल हाशिलाचे दर ठरविण्याचा अधिकार.

७. (१) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस, इंडिया गॅझेटांत जाहिरनामा देऊन त्याच्याद्वारें, या आक्टाअन्वयें देशांतील टपालानें पाठवावयाच्या टपालाच्या जिनसांबाबद घ्यावयाच्या टपाल हाशिलाचे दर व इतर रकमा ठरविण्याचा अधिकार आहे, आणि याप्रमाणें ठरविलेलें टपाल हाशील वजनांच्या ज्या मानाप्रमाणें आणि ज्या अटींस व शर्तींस अनुसरून घ्यावयाचें त्यांबाबद कानू करण्याचा अधिकार आहे :

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, टपाल हाशील आगाऊ भरण्यांत येईल तेव्हां त्याचा शिकस्त दर, दरेक वर्गाच्या टपालाच्या जिनसांबद्दल पहिल्या परिशिष्टांत दर सांगितले आहेत त्यांहून जास्त असतां कामा नये.

(२) सदरीं सांगितल्या प्रकारचा जाहीरनामा काढण्यांत आल्याखेरीज व येई तोंपर्यंत, सदरहू परिशिष्टांत सांगितलेले दर हे या आक्टाअन्वयें घ्यावयाचे दर होत असें समजावें.

(३) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस, इंडिया गॅझेटांत जाहिरनामा देऊन त्याच्याद्वारें, या आक्टाच्या अर्थाप्रमाणें बुकांचीं व नमुन्यांचीं प्याकेटें ह्मणून कोणतीं प्याकेटें देशांतील टपालानें पाठवितां येतील हें ठरविण्याचा अधिकार आहे.

कित्येक बाबतींत टपाल हाशील व फी देण्याबाबद कानू करण्याचा अधिकार.

८. गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस, कानू करून,—

(अ) देशांतील टपालाच्या जिनसांबद्दल किंवा त्यांच्या कोणत्याही वर्गाबद्दल टपाल हाशील आगाऊ भरण्याविषयीं फर्मविण्याचा व तें कोणत्या रीतीनें आगाऊ भरावें हें ठरविण्याचा,

(ब) जेव्हां देशांतील टपालाच्या जिनसांबद्दल टपाल हाशील आगाऊ भरलेलें नसेल किंवा तें अपुरतें आगाऊ भरलेलें असेल, तेव्हां त्यांबद्दल घ्यावयाचें टपाल हाशील ठरविण्याचा,

(क) टपालाच्या जिनसांवर पत्ता पुनः लिहिण्याबद्दल, व याप्रमाणें पुनः पत्ता लिहिलेल्या जिनसा, मोफत किंवा सदरहू कानूंत सांगण्यांत येईल तशा जास्त हाशिलास पात्र ठेवून, टपालानें पाठविण्याबद्दल तजवीज करण्याचा, आणि

(ड) टपालाच्या जिनसा "मुद्दाम स्वाधीन करण्या" बद्दल, त्यांवर या आक्टाअन्वयें जें कोणतेंही दुसरें टपाल हाशील पडत असेल त्याखेरीज किंवा त्याऐवजीं, घ्यावयाच्या फी ठरविण्याचा,

अधिकार आहे.

**खुलासा.**—"मुद्दाम स्वाधीन करणें" याचा अर्थ, मुद्दाम पाठविलेल्या जासुदाच्या किंवा वाहनाच्या द्वारें स्वाधीन करणें, असा आहे.

रजिस्टर करावयाच्या वर्तमानपत्रांबाबद कानू करण्याचा अधिकार.

९. (१) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस, रजिस्टर करून देशांतील टपालानें पाठवावयाचीं वर्तमानपत्रें रजिस्टर करण्याबद्दल कानू करण्याचा अधिकार आहे.

(२) प्रसिद्ध झालेल्या ज्या लेखामध्यें, सर्वांशीं किंवा बहुतांशीं, राजकीय किंवा इतर बातमी, किंवा त्यासंबंधाचे किंवा इतर चालू विषयांसंबंधाचे निबंध, जाहिरातींसह किंवा

जाहिरातींवांचून, येतील असा दरेक लेख, सदरील प्रमाणें रजिस्टर करण्याच्या कारणाकरितां, वर्तमानपत्र आहे असें मानलें पाहिजे: मात्र त्याला खालील शर्ती लागू राहतील:—

(अ) त्याचे अंक, एकतीस दिवसांहून जास्त नाहीं अशा मुदतीच्या अंतरानीं प्रसिद्ध झाले पाहिजेत; आणि

(ब) त्याबद्दल एक वर्गणीदारांची खरी यादी असली पाहिजे.

(३) कोणा एकाद्या वर्तमानपत्राचें जादापत्रक किंवा पुरवणी हीं त्या वर्तमानपत्राच्याच तारिखेचीं असून त्यासोबत पाठविलेलीं असतील, तर तीं त्या वर्तमानपत्राच्या भागादाखल मानलीं पाहिजेत:

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, असें कोणतेंही जादापत्रक किंवा पुरवणी यांमध्यें, सर्वांशीं किंवा बहुतांशीं त्या त्या वर्तमानपत्रांतील मजकुरासारखा मजकूर असल्यावांचून आणि दरेक पृष्ठाच्या माथ्यावर त्या त्या वर्तमानपत्राचें नांव व तें प्रसिद्ध झाल्याची तारीख छापलेली असल्यावांचून, तीं सदर्हूप्रमाणें मानतां कामा नयेत.

**खुलासा.**—या कलमांतील किंवा त्याअन्वयें केलेल्या कानूंतील कोणत्याही मजकुरावरून, वर्तमानपत्रें देशांतील टपालानें पाठविणें भाग आहे असें समजूं नये.

परदेशी टपाल हाशिलाचे दर ठरविण्याचा अधिकार.

१०. (१) जेथें, ब्रिटिश हिंदुस्थानाच्या आणि संयुक्त राज्य किंवा ब्रिटिश अमलाखालील कोणताही मुलुख किंवा परदेश याच्या दर्म्यान टपालाच्या जिनसा टपालानें पाठविण्याकरितां, संयुक्त राज्याशीं किंवा असा मुलुख किंवा देश याशीं केलेली कांहीं व्यवस्था अमलांत असेल, तेथें गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस, अशा टपालाच्या जिनसांच्या संबंधानें टपाल हाशिलाचे कोणते दर व इतर रकमा घ्यावयाच्या हें सदरील व्यवस्थेच्या ठरावांस अनुकूल अशा रीतीनें ठरविण्याचा अधिकार आहे, आणि याप्रमाणें ठरविलेलें टपाल हाशील वजनांच्या ज्या मानाप्रमाणें, आणि ज्या अटींस व शर्तींस अनुसरून, घ्यावयाचें त्यांबाबद कानू करण्याचा अधिकार आहे.

(२) सदरीं सांगितल्या प्रकारचा ठराव केल्यावांचून व करण्यांत येई तोंपर्यंत चालू दर व नियम अमलांत राहतील.

टपाल हाशील देण्याबद्दलची जबाबदारी.

११. (१) ज्या टपालाच्या जिनसेवर या आक्टाअन्वयें पडणारें टपाल हाशील किंवा दुसरी कोणतीही रकम घेणें असेल, तिजवर ज्या मनुष्याचा पत्ता असेल त्यानें ती टपालाची जिन्नस आपल्या स्वाधीन घेतल्यावर, ती उघडल्यावांचून त्यानें लगेच परत न दिली तर, याप्रमाणें पडणारें टपाल हाशील किंवा रकम त्यानें दिली पाहिजे:

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, अशी कोणतीही टपालाची जिन्नस, तिजवर ज्याचा पत्ता असेल त्या मनुष्यास त्रास देण्यासाठीं दुष्ट भावानें पाठविली आहे अशी पोस्ट मास्तर जनरलची खातरी होईल, तर तें टपाल हाशील माफ करण्याचा त्यास अधिकार आहे.

(२) या आक्टाअन्वयें पडणारें टपाल हाशील किंवा दुसरी कोणतीही रकम ज्या कोणत्याही टपालाच्या जिनसेवर घेणें असेल ती जिन्नस घेण्याचें नाकारिलें किंवा सदरीं सांगितल्याप्रमाणें ती परत दिली, किंवा तिजवर ज्या मनुष्याचा पत्ता असेल तो मयत झाला असला किंवा सांपडत नसला, तर या आक्टाअन्वयें तिजवर येणें असणारें टपाल हाशील किंवा रकम ती जिन्नस पाठविणारानें दिली पाहिजे.

टपालाच्या जिनसांबाबद येणें असलेलें टपाल हाशील व इतर रकमा वसूल करणें.

१२. जर कोणताही मनुष्य, कोणत्याही टपालाच्या जिनसेबाबद त्याकडून या आक्टाअन्वयें येणें असलेलें कोणतेंही टपाल हाशील किंवा इतर रकम देण्याचें नाकारील तर याप्रमाणें येणें असलेली रकम, पोस्ट आफिसच्या ज्या अमलदारास त्याबाबद पोस्ट मास्तर जनरल याच्या लेखी हुकुमानें अधिकार मिळाला असेल त्यानें अर्जी केली असतां,

याप्रमाणें नाकारणारा मनुष्य त्या त्या वेळीं जेथें राहत असेल त्या जागीं अधिकार असणाऱ्या कोणत्याही माजिस्ट्रेटास, ती रकम या आक्टाअन्वयें केलेला दंड असल्याप्रमाणें, त्या मनुष्याकडून पोस्ट आफिसच्या उपयोगाकरितां वसूल करण्याचा अधिकार आहे; शिवाय पोस्ट मास्तर जनरल यास, त्या मनुष्याच्या पत्त्यावर पाठविलेली, मलिक माआझमांच्या कामाची नाहीं अशी दुसरी कोणतीही टपालाची जिन्नस, याप्रमाणें येणें असलेली रकम देण्यांत किंवा सदरीं सांगितल्याप्रमाणें वसूल करण्यांत येई तोंपर्यंत त्याला देऊं नये असें फर्माविण्याचाहि अधिकार आहे.

पोस्ट आफिसानें दिलेली कस्टमची ड्यूटी टपाल हाशिलाप्रमाणें वसूल करतां येईल.

१३. ज्या टपालाच्या जिनसेवर कोणतीही कस्टमची ड्यूटी पडते अशी जिन्नस ब्रिटिश हिंदुस्थानाच्या हद्दीपलीकडील कोणत्याही जागेहून टपालांतून आलेली असून; पोस्टाच्या अधिकाऱ्यांनीं ती ड्यूटी कस्टमच्या कोणत्याही बंदरीं किंवा इतर ठिकाणीं दिलेली असेल, त्या प्रसंगीं त्या ड्यूटीची रकम, ती या आक्टाअन्वयें येणें असलेलें टपाल हाशील असल्याप्रमाणें, वसूल करतां येईल.

पोस्ट आफिसच्या निशाण्या, दर्शविलेल्या कित्येक गोष्टींच्या प्रथमदर्शनी पुराव्यादाखल आहेत.

१४. टपालाच्या जिनसेबाबद या आक्टाअन्वयें कोणतेंही टपाल हाशील किंवा इतर रकम येणें आहे असें ह्मणणें असेल, ती वसूल करण्याकरितां चालवलेल्या दरेक कामांत,—

(अ) ती टपालाची जिन्नस घेण्याचें नाकारलें, किंवा तिजवर ज्या मनुष्याचा पत्ता असेल तो मयत झाला किंवा सांपडत नाहीं, असें दर्शविणारी पोस्ट आफिसची निशाणी तिजवर असून ती जिन्नस हजर केली ह्मणजे, तो याप्रमाणें दर्शविलेल्या गोष्टीचा प्रथमदर्शनी पुरावा होईल; आणि

(ब) ज्या मनुष्याकडून ती टपालाची जिन्नस आली असें दिसेल, त्यानें ती पाठविली असें, उलट शाबिती होईपर्यंत, समजलें पाहिजे.

आफिसची निशाणी, टपाल हाशिलाच्या रकमेच्या पुराव्यादाखल आहे.

१५. टपालाच्या जिनसेबाबद कोणतेंही टपाल हाशील किंवा इतर रकम ब्रिटिश हिंदुस्थानच्या पोस्ट आफिसास किंवा संयुक्त राज्याच्या किंवा कोणताही ब्रिटिश अमलाखालील मुलुख किंवा परदेश याच्या पोस्ट आफिसास येणें आहे असें दर्शविणारी त्या जिनसेवरील आफिसची निशाणी, सदरीं सांगितल्याप्रमाणें दर्शविलेली रकम याप्रमाणें येणें आहे या गोष्टीच्या प्रथमदर्शनी पुराव्यादाखल आहे.

---

## बाब ४.

### टपाल हाशिलाचे स्टांप.

टपाल हाशिलाच्या स्टांपांची योजना व त्यांबाबद कानू करण्याचा अधिकार.

१६. (१) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं, या आक्टाच्या कारणांकरितां त्यांस जरूर वाटतील तशा जातींच्या व तशा किंमती दर्शविणाऱ्या टपाल हाशिलाच्या स्टांपांची योजना करविली पाहिजे.

(२) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस, टपाल हाशिलाच्या स्टांपांचा पुरवठा, विक्री, व उपयोग करणें, यांबाबद कानू करण्याचा अधिकार आहे.

(३) विशेषेंकरून, व सदरील सामान्य अधिकारास बाध न येतां, अशा कानूंमध्यें—

(अ) ज्या किंमतीनें टपाल हाशिलाचे स्टांप विकावयाचे ती किंमत ठरविण्याचा,

(ब) या आक्टाअन्वयें घ्यावयाचें टपाल हाशील किंवा इतर रकमा भरण्याकरितां, ज्या वर्गाच्या टपालाच्या जिनसांबाबद टपाल हाशिलाच्या स्टांपांचा उपयोग करावयाचा ते वर्ग ठरविण्याचा,

(क) छिद्र पाडणें, खरडून वगैरे काढणें आणि इतर सर्व बाबती, यांसंबंधाच्या ज्या शर्तींस अनुसरून टपाल हाशिलाचे स्टांप टपाल हाशील किंवा इतर रकमा भरण्याकरितां घेतां येतील किंवा येणार नाहींत, त्या शर्ती ठरविण्याचा,

(ड) टपाल हाशिलाच्या स्टांपांची रखवाली, पुरवठा व विकरी यांबाबद नियम करण्याचा,

(इ) ज्या मनुष्यांस आणि ज्या अटींनीं व शर्तींनीं टपाल हाशिलाचे स्टांप विकतां येतील, तीं मनुष्यें आणि त्या अटी व शर्ती ठरविण्याचा, आणि

(फ) टपाल हाशिलाचे स्टांप विकणाऱ्या मनुष्यांचीं कामें व मेहनताना ठरविण्याचा,

अधिकार आहे.

टपाल हाशिलाचे स्टांप हे महसुलाच्या कारणाकरितां स्टांप आहेत असें समजणें.

१७. कलम १६ अन्वयें ज्या टपाल हाशिलाच्या स्टांपांची योजना केली असेल ते, हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षाकरण्याविषयीं कायदा याच्या अर्थाप्रमाणें महसुलाच्या कारणाकरितां सरकारानें काढलेले स्टांप आहेत असें समजलें पाहिजे, आणि टपालाच्या जिनसांबाबद या आक्टाअन्वयें घ्यावयाचें टपाल हाशील किंवा इतर रकमा दुसऱ्या कोणत्या तरी रीतीनें आगाऊ भरण्याविषयीं गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं फर्माविलें नसेल त्या प्रसंगीं तें टपाल हाशील किंवा रकमा, या आक्टांतील इतर ठरावांस अनुसरून आगाऊ भरण्याकरितां सदरहू स्टांपांचा उपयोग केला पाहिजे.

---

## बाब ५.

### टपालाच्या जिनसा पाठविण्याच्या शर्ती.

टपालाची जिन्नस टपालांतून जात असतांना पाठविणाराच्या परत स्वाधीन करणें.

१८. (१) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस, कानू करून, कोणतीही टपालाची जिन्नस टपालांतून जात असतांना तिजवर ज्या मनुष्याचा पत्ता असेल त्याच्या अनुमताविषयीं त्याला विचारल्यावांचून आणि ज्या कोणत्याही शर्ती घालणें योग्य वाटेल (वाटल्यास) त्यांस अनुसरून, ती पाठविणाराच्या परत स्वाधीन करण्याबद्दल तजवीज करण्याचा अधिकार आहे.

(२) पोटकलम (१) याअन्वयें केलेल्या कोणत्याही कानूंमध्यें ठरविलें असेल तें खेरीज करून, टपालाची जिन्नस टपालांतून जात असतांना परत मागण्याचा ती पाठविणारास हक्क नाहीं.

कोणतीही अपायकारक वस्तु टपालानें पाठविण्याची मनाई आहे.

१९. (१) कानू करून इतर रीतीनें ठरविलें असेल आणि त्यांत ठरविलेल्या शर्तींस अनुसरून तेवढें खेरीज करून, कोणत्याही मनुष्यानें कोणताही दारी, भयकारक, कंटाळवाणा, अपकारक किंवा घातक पदार्थ, ज्याविषयीं योग्य बंदोबस्त केलेला नाहीं असें कोणतेंही तीक्ष्ण हत्यार, किंवा अपकारक किंवा टपालांतून जात असतील त्या टपालाच्या जिनसांस किंवा पोस्ट आफिसच्या कोणत्याही अमलदारास अपाय करण्यासारखा कोणताही जीवंत प्राणी टपालांतून पाठवितां कामा नये.

(२) कोणत्याही मनुष्यानें, टपालांतून जात असतील त्या कोणत्याही टपालाच्या जिनसांस किंवा पोस्ट आफिसच्या कोणत्याही अमलदारास अपाय करण्यासारखी कोणतीही जिन्नस किंवा वस्तु टपालानें पाठवितां कामा नये.

कोणतीही विचकट वस्तु टपालानें पाठविण्याची मनाई आहे.

२०. कोणत्याही मनुष्यानें—

(अ) कोणतीही विचकट किंवा बीभत्स छापलेली वस्तु, तसबीर, फोटोग्राफ, लिथोग्राफ, नकासलेली वस्तु, पुस्तक किंवा कार्ड किंवा दुसरी कोणतीही विचकट किंवा बीभत्स जिन्नस, किंवा

(ब) जिजवर किंवा जिच्या वेष्टनावर विचकट, बीभत्स, दंगेखोर, नीच, धमकीचे किंवा मन भारी दुखे असे कोणतेही शब्द, खुणा किंवा योजना आहेत अशी कोणतीही टपालाची जिन्नस,

टपालांतून पाठवितां कामा नये.

टपालाच्या जिनसा टपालानें पाठविण्याबाबद कानू करण्याचा अधिकार.

२१. (१) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस, टपालाच्या जिनसा टपालानें पाठविण्याबाबद कानू करण्याचा अधिकार आहे.

(२) विशेषेंकरून, व सदरील सामान्य अधिकारास बाध न येतां, अशा कानूंमध्यें—

(अ) टपालाच्या जिनसांकरितां पावत्या देण्याबद्दल, आणि त्या टपालांत घातल्याचे व स्वाधीन केल्याचे दाखले देण्याबद्दल व मिळविण्याबद्दल तजवीज करण्याचा, आणि अशा पावत्यांकरितां व दाखल्यांकरितां, दुसऱ्या कोणत्याही टपाल हाशिलाखेरीज आणखी, द्यावयाच्या रकमा ठराविण्याचा, आणि

(ब) पत्रांखेरीज ज्या पत्रव्यवहार करण्याच्या टपालाच्या जिनसा त्यांचीं वेष्टनें, आकार, परिमाण, शिकस्त वजन व सोबतच्या वस्तु, आणि उपयोग करणें यांबाबद नियम करण्याचा,

अधिकार आहे.

(३) टपालाच्या जिनसा, डायरेक्टर जनरल हुकूम करून वेळोवेळीं नेमील तशा वेळीं व रीतीनें टपालांत घातल्या पाहिजेत व स्वाधीन केल्या पाहिजेत.

कित्येक टपालाच्या जिनसा पाठविण्याचें किंवा स्वाधीन करण्याचें तहकूब ठेवण्याचा अधिकार.

२२. (१) जेव्हां एकाद्या पोस्ट आफिसांतून पत्रें रवाना करविण्याच्या किंवा स्वाधीन करण्याच्या कामास, त्याच वेळीं तेथून बुकांचीं किंवा नमुन्यांचीं प्याकेटें व पार्सलें, किंवा त्यांपैकीं कोणतींही प्याकेटें व पार्सलें, रवाना करण्याच्या किंवा स्वाधीन करण्याच्या कामामुळें विलंब होण्यासारखा असेल, तेव्हां अशीं प्याकेटें किंवा पार्सलें, किंवा त्यांपैकीं कोणतींहीं प्याकेटें किंवा पार्सलें, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं त्याबाबद केलेल्या कानूंस अनुसरून, जरूर असेल तेवढ्या वेळापर्यंत त्या पोस्ट आफिसांत मागें ठेविलीं पाहिजेत.

(२) जेथें निराळीं पार्सल पोस्टें स्थापलीं असतील, तेथें त्यांस पार्सलें रवाना करण्याचा व नेण्याचा अधिकार आहे, आणि, जरूर असल्यास, तीं त्या कारणासाठीं त्या त्या पोस्ट आफिसांत मागें ठेवण्याचा अधिकार आहे.

आक्टाविरुद्ध टपालांत घातलेल्या टपालाच्या जिनसांची व्यवस्था करण्याचा अधिकार.

२३. (१) या आक्टांतील कोणत्याही ठरावांविरुद्ध टपालानें पाठविलेली कोणतीही टपालाची जिन्नस अटकवण्याचा आणि ती पाठविणारास परत देण्याचा किंवा ती जावयाची असेल त्या ठिकाणीं रवाना करण्याचा अधिकार आहे: मात्र अशा दरेक प्रसंगीं, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं कानू करून कांहीं जादा टपाल हाशील घेण्याविषयीं फर्माविलेलें असल्यास तें तिजवर घेतलें पाहिजे.

(२) पोस्ट आफिसावरील, किंवा त्याबाबद पोस्ट मास्तर जनरलनें अधिकार दिलेल्या, कोणत्याही अमलदारास टपालांतून जात असेल असें जें कोणतेंही वर्तमानपत्र किंवा बुकाचें किंवा नमुन्याचें प्याकेट २१ व्या कलमाविरुद्ध किंवा टपाल हाशिलासंबंधी या आक्टांतील कोणत्याही ठरावांविरुद्ध टपालानें पाठविलें आहे असा वहीम येईल, तें उघडण्याचा किंवा सोडण्याचा अधिकार आहे.

(३) पोटकलम (१) यांत कोणताही मजकूर असला तथापि,—

(अ) १९ व्या कलमांतील ठरावांविरुद्ध टपालानें पाठविलेली कोणतीही टपालाची जिन्नस, पोस्ट मास्तर जनरलच्या हुकुमाअन्वयें, जरूर असल्यास, उघडून नाश करण्याचा अधिकार आहे; आणि

(ब) २० व्या कलमांतील ठरावांविरुद्ध टपालानें पाठविलेल्या कोणत्याही टपालाच्या जिनसेचा, पोस्ट मास्तर जनरलच्या हुकुमाअन्वयें, नाश करण्याचा अधिकार आहे.

मनाईचा किंवा ड्यूटीस पात्र असणारा माल ज्या टपालाच्या जिनसांमध्यें असेल त्यांची व्यवस्था करण्याचा अधिकार.

२४. कोणत्याही पोस्ट आफिसांत, स्वाधीन करण्याकरितां, आलेल्या टपालाच्या जिनसेंत कोणताही मनाईचा माल किंवा ड्यूटीस पात्र असणारी कोणतीही वस्तु आहे असा वहीम येईल, तेव्हां त्या पोस्ट आफिसावरील अमलदारानें, तिजवर ज्या मनुष्याचा पत्ता असेल त्याला एक लेखी नोटीस पाठवून तिच्याद्वारें, त्यानें जातीनें किंवा त्याच्या एजंटानें त्या पोस्ट आफिसांत अमुक वेळाच्याआंत हजर व्हावें असें त्यास कळविलें पाहिजे आणि त्या मनुष्यासमक्ष किंवा त्याच्या एजंटासमक्ष, किंवा तो मनुष्य किंवा त्याचा एजंट सदरीं सांगितल्याप्रमाणें हजर न झाला तर त्याच्या अपरोक्ष, ती टपालाची जिन्नस उघडून तपासली पाहिजे:

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं— .

१. जर डायरेक्टर जनरल, कोणत्याही पोस्ट आफिसाच्या किंवा कोणत्याही वर्गाच्या पोस्ट आफिसांच्या बाबतींत तसें फर्मावील, तर त्या त्या पोस्ट आफिसावरील अमलदारानें, सदरहू मनुष्याच्या किंवा त्याच्या एजंटच्या अपरोक्ष टपालाची जिन्नस उघडण्यापूर्वी दोन आब्रूदार मनुष्यांस साक्षीदार बोलाविलें पाहिजे:

२. टपालाची जिन्नस या कलमाअन्वयें उघडल्यावर, सर्व प्रसंगीं ती, ह्या कायद्याअन्वयें किंवा त्या त्या वेळीं अमलांत असणाऱ्या दुसऱ्या कोणत्याही कायद्याकानुअन्वयें आणखी कोणतेंही काम चालविण्याच्या कारणाकरितां तिची जरूरी नसल्यास, तिजवर ज्याचा पत्ता असेल त्या मनुष्याच्या स्वाधीन केली पाहिजे, आणि ती टपालाची जिन्नस उघडल्याची गोष्ट व त्यासंबंधाची हकीकत यांबाबद पोस्ट मास्तर जनरलास तावडतोब रिपोर्ट केला पाहिजे.

३. या कलमांतील कोणत्याही मजकुरावरून, ब्रिटिश हिंदुस्थानच्या हद्दीपलीकडील कोणत्याही जागेहून टपालानें आलेलीं पार्सलें ज्या कस्टमच्या बंदरीं किंवा इतर जागीं येतील तेथें तीं अटकवण्याची आणि कस्टमची कोणतीही ड्यूटी घेण्याच्या कारणाकरितां कस्टमच्या अधिकाऱ्यांनीं उघडण्याची मनाई आहे असें समजूं नये.

ज्याबद्दल जाहिरनामा प्रसिद्ध झाला असेल असा माल टपालांतून जात असतांना थांबविण्याचा अधिकार.

२५. जेव्हां, कोणत्याही निर्दिष्ट केलेल्या प्रकारच्या कोणत्याही मालाबाबद, सन १८७८ चा जलमार्गाचे कस्टमचा आक्ट याच्या १९ व्या कलमाअन्वयें जाहिरनामा प्रसिद्ध झाला असेल तेव्हां, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं त्याबाबद अधिकार दिलेल्या पोस्ट आफिसच्या कोणत्याही अमलदारास, असा कोणताही माल टपालांतून जात असतांना त्याबद्दल झाडा घेण्याचा किंवा घेवविण्याचा अधिकार आहे, आणि त्यानें मिळालेला असा सर्व माल गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे त्याबाबद जो अमलदार नेमतील त्याच्या स्वाधीन केला पाहिजे, आणि गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे फर्मावितील त्या रीतीनें अशा मालाची व्यवस्था करण्याचा अधिकार आहे.

सार्वजनिक कल्याणाकरितां टपालाच्या जिनसा थांबविण्याचा अधिकार.

२६. (१) कोणताही सार्वजनिक निकडीचा प्रसंग आला असतां, किंवा सार्वजनिक सुरक्षितपणाच्या किंवा स्वस्थपणाच्या कारणाकरितां, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस किंवा स्थानिक सरकारास, किंवा ज्या कोणत्याही अमलदारास त्याबाबद गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे विशेष रीतीनें अधिकार देतील त्यास, लेखी हुकुमाच्या द्वारें, कोणतीही टपालाची जिन्नस किंवा कोणत्याही वर्गाच्या किंवा प्रकारच्या टपालाच्या जिनसा टपालांतून जात असतांना, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे फर्मावितील त्या रीतीनें त्यांची व्यवस्था करण्याकरितां, थांबवाव्या किंवा अटकवून

(ब) जिजवर किंवा जिच्या वेष्टनावर विचकट, बीभत्स, दंगेखोर, नीच, धमकीचे किंवा मन भारी दुखे असे कोणतेही शब्द, खुणा किंवा योजना आहेत अशी कोणतीही टपालाची जिन्नस,

टपालांतून पाठवितां कामा नये.

टपालाच्या जिनसा टपालानें पाठविण्याबाबद कानू करण्याचा अधिकार.

२१. (१) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस, टपालाच्या जिनसा टपालानें पाठविण्याबाबद कानू करण्याचा अधिकार आहे.

(२) विशेषेंकरून, व सदरील सामान्य अधिकारास बाध न येतां, अशा कानूंमध्यें—

(अ) टपालाच्या जिनसांकरितां पावत्या देण्याबद्दल, आणि त्या टपालांत घातल्याचे व स्वाधीन केल्याचे दाखले देण्याबद्दल व मिळविण्याबद्दल तजवीज करण्याचा, आणि अशा पावत्यांकरितां व दाखल्यांकरितां, दुसऱ्या कोणत्याही टपाल हाशिलाखेरीज आणखी, द्यावयाच्या रकमा ठराविण्याचा, आणि

(ब) पत्रांखेरीज ज्या पत्रव्यवहार करण्याच्या टपालाच्या जिनसा त्यांचीं वेष्टनें, आकार, परिमाण, शिकस्त वजन व सोबतच्या वस्तु, आणि उपयोग करणें यांबाबद नियम करण्याचा,

अधिकार आहे.

(३) टपालाच्या जिनसा, डायूरेक्टर जनरल हुकूम करून वेळोवेळीं नेमील तशा वेळीं व रीतीनें टपालांत घातल्या पाहिजेत व स्वाधीन केल्या पाहिजेत.

कित्येक टपालाच्या जिनसा पाठविण्याचें किंवा स्वाधीन करण्याचें तहकूब ठेवण्याचा अधिकार.

२२. (१) जेव्हां एकाद्या पोस्ट आफिसांतून पत्रें रवाना करविण्याच्या किंवा स्वाधीन करण्याच्या कामास, त्याच वेळीं तेथून बुकांचीं किंवा नमुन्यांचीं प्याकेटें व पार्सलें, किंवा त्यांपैकीं कोणतींही प्याकेटें व पार्सलें, रवाना करण्याच्या किंवा स्वाधीन करण्याच्या कामामुळें विलंब होण्यासारखा असेल, तेव्हां अशीं प्याकेटें किंवा पार्सलें, किंवा त्यांपैकीं कोणतींहीं प्याकेटें किंवा पार्सलें, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं त्याबाबद केलेल्या कानूंस अनुसरून, जरूर असेल तेवढ्या वेळापर्यंत त्या पोस्ट आफिसांत मागें ठेविलीं पाहिजेत.

(२) जेथें निराळीं पार्सल पोस्टें स्थापलीं असतील, तेथें त्यांस पार्सलें रवाना करण्याचा व नेण्याचा अधिकार आहे, आणि, जरूर असल्यास, तीं त्या कारणासाठीं त्या त्या पोस्ट आफिसांत मागें ठेवण्याचा अधिकार आहे.

आक्टाविरुद्ध टपालांत घातलेल्या टपालाच्या जिनसांची व्यवस्था करण्याचा अधिकार.

२३. (१) या आक्टांतील कोणत्याही ठरावांविरुद्ध टपालानें पाठविलेली कोणतीही टपालाची जिन्नस अटकवण्याचा आणि ती पाठविणारास परत देण्याचा किंवा ती जावयाची असेल त्या ठिकाणीं रवाना करण्याचा अधिकार आहेः मात्र अशा दरेक प्रसंगीं, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं कानू करून कांहीं जादा टपाल हाशील घेण्याविषयीं फर्माविलेलें असल्यास तें तिजवर घेतलें पाहिजे.

(२) पोस्ट आफिसावरील, किंवा त्याबाबद पोस्ट मास्तर जनरलनें अधिकार दिलेल्या, कोणत्याही अमलदारास टपालांतून जात असेल असें जें कोणतेंही वर्तमानपत्र किंवा बुकाचें किंवा नमुन्याचें प्याकेट २१ व्या कलमाविरुद्ध किंवा टपाल हाशिलासंबंधी या आक्टांतील कोणत्याही ठरावांविरुद्ध टपालानें पाठविलें आहे असा वहीम येईल, तें उघडण्याचा किंवा सोडण्याचा अधिकार आहे.

(३) पोटकलम (१) यांत कोणताही मजकूर असला तथापि,—

(अ) १९ व्या कलमांतील ठरावांविरुद्ध टपालानें पाठविलेली कोणतीही टपालाची जिन्नस, पोस्ट मास्तर जनरलच्या हुकुमाअन्वयें, जरूर असल्यास, उघडून नाश करण्याचा अधिकार आहे; आणि

(ब) २० व्या कलमांतील ठरावांविरुद्ध टपालानें पाठविलेल्या कोणत्याही टपालाच्या जिनसेचा, पोस्ट मास्तर जनरलच्या हुकुमाअन्वयें, नाश करण्याचा अधिकार आहे.

मनाईचा किंवा ड्यूटीस पात्र असणारा माल ज्या टपालाच्या जिनसांमध्यें असेल त्यांची व्यवस्था करण्याचा अधिकार.

२४. कोणत्याही पोस्ट आफिसांत, स्वाधीन करण्याकरितां, आलेल्या टपालाच्या जिनसेंत कोणताही मनाईचा माल किंवा ड्यूटीस पात्र असणारी कोणतीही वस्तु आहे असा वहीम येईल, तेव्हां त्या पोस्ट आफिसावरील अमलदारानें, तिजवर ज्या मनुष्याचा पत्ता असेल त्याला एक लेखी नोटीस पाठवून तिच्याद्वारें, त्यानें जातीनें किंवा त्याच्या एजंटानें त्या पोस्ट आफिसांत अमुक वेळाच्याआंत हजर व्हावें असें त्यास कळविलें पाहिजे आणि त्या मनुष्यासमक्ष किंवा त्याच्या एजंटासमक्ष, किंवा तो मनुष्य किंवा त्याचा एजंट सदरीं सांगितल्याप्रमाणें हजर न झाला तर त्याच्या अपरोक्ष, ती टपालाची जिन्नस उघडून तपासली पाहिजेः

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं— .

१. जर डायरेक्टर जनरल, कोणत्याही पोस्ट आफिसाच्या किंवा कोणत्याही वर्गाच्या पोस्ट आफिसांच्या बाबतींत तसें फर्मावील, तर त्या त्या पोस्ट आफिसावरील अमलदारानें, सदरहू मनुष्याच्या किंवा त्याच्या एजंटच्या अपरोक्ष टपालाची जिन्नस उघडण्यापूर्वीं दोन आब्रूदार मनुष्यांस साक्षीदार बोलाविलें पाहिजेः

२. टपालाची जिन्नस या कलमाअन्वयें उघडल्यावर, सर्व प्रसंगीं ती, ह्या कायद्याअन्वयें किंवा त्या त्या वेळीं अमलांत असणाऱ्या दुसऱ्या कोणत्याही कायद्याकानूअन्वयें आणखी कोणतेंही काम चालविण्याच्या कारणाकरितां तिची जरूरी नसल्यास, तिजवर ज्याचा पत्ता असेल त्या मनुष्याच्या स्वाधीन केली पाहिजे, आणि ती टपालाची जिन्नस उघडल्याची गोष्ट व त्यासंबंधाची हकीकत यांबाबद पोस्ट मास्तर जनरलास ताबडतोब रिपोर्ट केला पाहिजे.

३. या कलमांतील कोणत्याही मजकुरावरून, ब्रिटिश हिंदुस्थानच्या हद्दीपलीकडील कोणत्याही जागेहून टपालानें आलेलीं पार्सलें ज्या कस्टमच्या बंदरीं किंवा इतर जागीं येतील तेथें तीं अटकवण्याची आणि कस्टमची कोणतीही ड्यूटी घेण्याच्या कारणाकरितां कस्टमच्या अधिकाऱ्यांनीं उघडण्याची मनाई आहे असें समजूं नये.

ज्याबद्दल जाहिरनामा प्रसिद्ध झाला असेल असा माल टपालांतून जात असतांना थांबविण्याचा अधिकार.

२५. जेव्हां, कोणत्याही निर्दिष्ट केलेल्या प्रकारच्या कोणत्याही मालाबाबद, सन १८७८ चा जलमार्गाचे कस्टमचा आक्ट याच्या १९ व्या कलमाअन्वयें जाहिरनामा प्रसिद्ध झाला असेल तेव्हां, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं त्याबाबद अधिकार दिलेल्या पोस्ट आफिसच्या कोणत्याही अमलदारास, असा कोणताही माल टपालांतून जात असतांना त्याबद्दल झाडा घेण्याचा किंवा घेवविण्याचा अधिकार आहे, आणि त्यानें मिळालेला असा सर्व माल गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे त्याबाबद जो अमलदार नेमतील त्याच्या स्वाधीन केला पाहिजे, आणि गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे फर्मावितील त्या रीतीनें अशा मालाची व्यवस्था करण्याचा अधिकार आहे.

सार्वजनिक कल्याणाकरितां टपालाच्या जिनसा थांबविण्याचा अधिकार.

२६. (१) कोणताही सार्वजनिक निकडीचा प्रसंग आला असतां, किंवा सार्वजनिक सुरक्षितपणाच्या किंवा स्वस्थपणाच्या कारणाकरितां, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस किंवा स्थानिक सरकारास, किंवा ज्या कोणत्याही अमलदारास त्याबाबद गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे विशेष रीतीनें अधिकार देतील त्यास, लेखी हुकुमाच्या द्वारें, कोणतीही टपालाची जिन्नस किंवा कोणत्याही वर्गाच्या किंवा प्रकारच्या टपालाच्या जिनसा टपालांतून जात असतांना, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे फर्मावितील त्या रीतीनें त्यांची व्यवस्था करण्याकरितां, थांबवाव्या किंवा अटकावून

ठेवाव्या किंवा सरकारच्या किंवा त्या हुकुमांत सांगितलेल्या त्याच्या अमलदाराच्या स्वाधीन कराव्या असें फर्माविण्याचा अधिकार आहे.

(२) सार्वजनिक निकडीचा प्रसंग प्राप्त झाला होता किंवा कसें याविषयीं, किंवा पोटकलम (१) याअन्वयें केलेलें कोणतेंही कृत्य सार्वजनिक सुरक्षितपणाच्या किंवा स्वस्थपणाच्या संबंधानें हिताचें होतें किंवा कसें याविषयीं कोणताही संशय उत्पन्न होईल, तर हिंदुस्थान सरकारच्या किंवा स्थानिक सरकारच्या एकाद्या सेक्रेटरीच्या सहीचा दाखला त्या गोष्टीबाबद निरुत्तर पुरावा होईल.

परमुलुकाहून आलेल्या ज्या टपालाच्या जिनसांला खोटे किंवा पूर्वी उपयोग केलेले स्टांप असतील त्यांची व्यवस्था करण्याचा अधिकार.

२७ (१) जेव्हां ब्रिटिश हिंदुस्थानाच्या हद्दींपलीकडील कोणत्याही जागेहून टपालाची जिन्नस टपालानें आलेली असून—

(अ) तिजवर टपाल हाशिलाचा खोटा स्टांप, ह्मणजे कोणत्याही टपाल हाशिलाच्या स्टांपाची हुबेहूब नकल किंवा अनुकृति किंवा प्रतिमा असेल, किंवा

(ब) जिचें टपाल हाशील आगाऊ भरण्याकरितां, दुसऱ्या कोणत्याही टपालाच्या जिनसेचें आगाऊ टपाल हाशील भरण्याकरितां पूर्वी उपयोग केलेल्या टपाल हाशिलाच्या स्टांपाचा उपयोग केला आहे असें दिसेल.

तेव्हां, ज्या पोस्ट आफिसांत ती टपालाची जिन्नस येईल त्यावरील अमलदारानें, तिजवर ज्या मनुष्याचा पत्ता असेल त्यास एक नोटीस पाठवून तिच्याद्वारें, ती टपालाची जिन्नस स्वाधीन घेण्याकरितां, त्या पोस्ट आफिसांत अमुक वेळाच्याआंत, त्यानें जातीनें किंवा त्याच्या एजंटानें हजर व्हावें असें कळविलें पाहिजे.

(२) जर सदरहू मनुष्य किंवा त्याचा एजंट त्या नोटिशींत सांगितलेल्या वेळाच्याआंत त्या पोस्ट आफिसांत हजर झाला आणि ती टपालाची जिन्नस पाठविणाराचें नांव व पत्ता त्या पोस्ट आफिसावरील अमलदारास कळविण्यास आणि त्या टपालाच्या जिनसेच्या ज्या भागावर पत्ता आणि खोटा किंवा पूर्वी उपयोग केलेला टपाल हाशिलाचा स्टांप असेल तो भाग, किंवा ती टपालाची जिन्नस त्या स्टांपापासून निराळी करतां येत नसली, तर ती सबंध टपालाची जिन्नस, सदरीं सांगितलेल्या अमलदाराच्या परत स्वाधीन करण्यास कबूल असला, तर ती टपालाची जिन्नस त्या मनुष्याच्या किंवा त्याच्या एजंटाच्या स्वाधीन केली पाहिजे.

(३) जर तो मनुष्य किंवा त्याचा एजंट त्या नोटिशींत सांगितलेल्या वेळाच्याआंत त्या पोस्ट आफिसांत हजर झाला नाहीं, किंवा त्यानें त्या वेळाच्याआंत हजर होऊन, ती जिन्नस पाठविणाराचें नांव व पत्ता कळविण्याचें किंवा पोटकलम (२) यावरून जरूर असल्याप्रमाणें टपालाची जिन्नस किंवा तिचा भाग परत स्वाधीन करण्याचें नाकारिलें, तर ती टपालाची जिन्नस त्याच्या स्वाधीन न करतां, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे फर्मावितील त्या रीतीनें तिची व्यवस्था केली पाहिजे.

खुलासा.—या कलमाच्या कारणाकरितां "टपाल हाशिलाचा स्टांप" या शब्दांमध्यें मलिका मआज्झमांच्या राज्याच्या कोणत्याही भागाच्या किंवा कोणत्याही देशी संस्थानाच्या किंवा परदेशाच्या टपाल हाशिलाचा कोणताही दर किंवा ड्यूटी दर्शविण्याबद्दलच्या कोणत्याही टपाल हाशिलाच्या स्टांपाचा समावेश होतो.

———

## वाव ६.

### रजिस्टर करणें, विमा उतरणें, व व्ह्याल्यूपेएबल पोस्ट यांबाबद.

२८. टपालाची जिन्नस पाठविणारास, ती जिन्नस ज्या पोस्ट आफिसांत घालवयाची असेल तेथें ती, या आक्टांतील दुसऱ्या ठरावांस अनुसरून, रजिस्टर करविण्याचा आणि त्याबद्दल पावती मागण्याचा अधिकार आहे; आणि गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस, इंडिया गझेटांत जाहिरनामा देऊन त्याच्या द्वारें, या आक्टाअन्वयें घ्यावयाच्या कोणत्याही टपाल हाशिलाखेरीज आणखी त्या जाहिरनाम्यांत ठरविण्यांत येईल ती जास्त फी टपालाच्या जिनसा रजिस्टर करण्याबद्दल दिली पाहिजे असें फर्माविण्याचा अधिकार आहे. टपालच्या जिनसा रजिस्टर करणें.

२९. (१) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस, टपालाच्या जिनसा रजिस्टर करण्याबाबद कानू करण्याचा अधिकार आहे. रजिस्टर करण्याबाबद कानू करण्याचा अधिकार.

(२) विशेषेंकरून, व सदरील सामान्य अधिकारास बाध न येतां, अशा कानूंमध्यें—

(अ) कोणत्या बाबतींमध्यें रजिस्टर करण्याची जरूरी आहे तें ठरविण्याचा,

(ब) रजिस्टर करण्याबद्दल फी कोणत्या रीतीनें द्यावयाच्या तें ठरविण्याचा, आणि

(क) रजिस्टर करणें जरूर आहे अशा ज्या टपालाच्या जिनसेवर रजिस्टर करण्याबद्दलची फी आगाऊ भरलेली नसेल ती जिन्नस स्वाधीन करते वेळीं रजिस्टर करण्याबद्दलची दुप्पट फी घेतली पाहिजे असें फर्माविण्याचा,

अधिकार आहे.

(३) रजिस्टर करण्याकरितां पोस्ट आफिसाच्या हवालीं दिलेल्या टपालाच्या जिनसा रजिस्टर करण्यांत आल्या ह्मणजे, डायरेक्टर जनरल हुकूम करून वेळोवेळीं नेमील त्या वेळीं व त्या रीतीनें स्वाधीन केल्या पाहिजेत.

३०. गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस, इंडिया गझेटांत जाहिरनामा देऊन— टपालाच्या जिनसांचा विमा उतरणें.

(अ) कोणतीही टपालाची जिन्नस टपालांतून जात असतांना ती नाहींशी होऊं नये किंवा तिला नुकसान होऊं नये यासाठीं, ज्या पोस्ट आफिसांत ती घालावयाची असेल तेथें तिचा विमा, या आक्टांतील दुसऱ्या ठरावांस अनुसरून, उतरण्याचा अधिकार आहे, आणि ती जिन्नस टपालांत घालणाऱ्या मनुष्यास त्याबद्दल पावती दिली पाहिजे, आणि

(ब) या आक्टाअन्वयें घ्यावयाचें कोणतेंही टपाल हाशील व रजिस्टर करण्याबद्दलची फी यांखेरीज आणखी, त्या जाहिरनाम्यांत ठरविण्यांत येईल ती जास्त फी टपालाच्या जिनसांचा विमा उतरण्याबद्दल दिली पाहिजे,

असें फर्माविण्याचा अधिकार आहे.

३१. गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस, इंडिया गझेटांत जाहिरनामा देऊन, कोणत्या बाबतींमध्यें विमा उतरणें जरूर आहे तें ठरविण्याचा, आणि विमा उतरणें जरूर आहे अशी कोणतीही वस्तु ज्या कोणत्याही टपालाच्या जिनसेंत असून जी विमा उतरल्यावांचून टपालांत घालण्यांत येईल ती जिन्नस, त्या जाहिरनाम्यांत ठरविण्यांत येईल ती विशेष फी घेऊन, ती पाठविणारास परत दिली पाहिजे किंवा तिजवर ज्या मनुष्याचा पत्ता असेल त्याच्या स्वाधीन केली पाहिजे असें फर्माविण्याचा अधिकार आहे: टपालाच्या जिनसांचा विमा उतरण्याविषयीं फर्माविण्याचा अधिकार.

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, सदरीं सांगितल्या प्रकारची विशेष फी घेतल्यामुळें, सेक्रेटरी ऑफ् स्टेट फॉर इंडिया इन् कौन्सिल यांवर, त्या टपालाच्या जिनसेबावद कोणतीही जबाबदारी येणार नाहीं.

विम्याबाबद कानू करण्याचा अधिकार.

३२. (१) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस, टपालाच्या जिनसांच्या विम्याबाबद कानू करण्याचा अधिकार आहे.

(२) विशेषेंकरून, व सदरील सामान्य अधिकारास बाध न येतां, अशा कानूंमध्यें—

(अ) ३० व्या कलमाअन्वयें कोणत्या वर्गांच्या टपालाच्या जिनसांचा विमा उतरतां येईल तें ठरविण्याचा,

(ब) ज्या रकमेपर्यंत टपालाच्या जिनसांचा विमा उतरतां येईल ती रकम ठरविण्याचा, आणि

(क) विम्याबद्दलची फी कोणत्या रीतीनें दिली पाहिजे तें ठरविण्याचा, अधिकार आहे.

(३) विमा उतरण्याकरितां पोस्ट आफिसच्या हवालीं दिलेल्या टपालाच्या जिनसा, विमा उतरला ह्मणजे, डायरेक्टर जनरल हुकुम करून वेळोवेळीं नेमील त्या जागीं व वेळीं आणि त्या रीतीनें स्वाधीन केल्या पाहिजेत.

विमा उतरलेल्या टपालाच्या जिनसांबाबद जबाबदारी.

३३. गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे कानू करून ठरवितील त्या शर्तींस व यत्तांस अनुसरून, सेक्रेटरी ऑफ् स्टेट फॉर इंडिया इन् कौन्सिल हे, विमा उतरलेली टपालाची जिन्नस किंवा तींतील वस्तु टपालांतून जात असतांना नाहींशी झाल्याबद्दल किंवा तिला कोणतेंही नुकसान झाल्याबद्दल, ती पाठविणारास, ज्या रकमेबद्दल त्या टपालाच्या जिनसेचा विमा उतरला असेल तिच्याहून जास्त नाहीं असा नुकसानाचा मोबदला देण्यास पात्र होतील:

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, याप्रमाणें द्यावयाचा मोबदला, कोणत्याही बाबतींत, नाहींशी झालेल्या जिनसेच्या किंमतीहून किंवा जेवढें नुकसान झालें असेल त्याच्या रकमेहून अधिक असतां कामा नये.

व्हाल्यू-पेएबल टपालाच्या जिनसा टपालानें पाठविणें.

३४. गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस, इंडिया गॅझेटांत जाहिरनामा देऊन त्याच्याद्वारें, टपालाची जिन्नस पाठविणारानें ती टपालांत घालते वेळीं लेखीं नमूद केलेली पैशाची रकम, या आक्टांतील दुसऱ्या ठरावांस अनुसरून व त्या जाहिरनाम्यांत ठरविण्यांत येतील त्या दरांनीं फी घेऊन, त्या जिनसेवर ज्या मनुष्याचा पत्ता असेल त्यापासून, ती स्वाधीन केल्यावर वसूल करण्याचा अख्त्यार आहे असें आणि याप्रमाणें वसूल केलेली रकम ती जिन्नस पाठविणारास दिली पाहिजे असें फर्माविण्याचा अधिकार आहे:

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, सेक्रेटरी ऑफ् स्टेट फॉर इंडिया इन् कौन्सिल यांवर, वसूल करण्याकरितां नमूद केलेली रकम सदरहू मनुष्याकडून आल्यावांचून व येई तोंपर्यंत, त्या रकमेबाबद कोणतीही जबाबदारी येणार नाहीं.

खुलासा.—या कलमांतील ठरावांवरहुकुम पाठविलेल्या टपालाच्या जिनसांस, "व्हाल्यूपेएबल" टपालाच्या जिनसा असें ह्मणतां येईल.

व्हाल्यू-पेएबल टपालाच्या जिनसांबाबद कानू करण्याचा अधिकार.

३५. (१) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस, व्हाल्यूपेएबल टपालाच्या जिनसा टपालानें पाठविण्याबाबद कानू करण्याचा अधिकार आहे.

(२) विशेषेंकरून, आणि सदरील सामान्य अधिकारास बाध न येतां, अशा कानूंमध्यें—

(अ) कोणत्या वर्गाच्या टपालाच्या जिनसा, व्ह्याल्यू-पेएबल टपालाच्या जिनसा ह्मणून पाठवितां येतील तें ठरविण्याचा,

(ब) टपालाची जिन्नस पाठविणारानें, आपणास खऱ्या भावानें आलेल्या मागणीअन्वयें ती पाठविण्यांत येत आहे असा इकरार केल्याखेरीज, तशी कोणतीही जिन्नस सदरीलप्रमाणें पाठवूं नये असें फर्माविण्याचा,

(क) कोणतीही व्ह्याल्यू-पेएबल टपालाची जिन्नस स्वाधीन करते वेळीं वसूल करावयाच्या किंमतीची यत्ता ठरविण्याचा, आणि

(ड) व्ह्याल्यूपेएबल टपालाच्या जिनसा पाठविणारांनीं करावयाच्या इकराराचा नमुना, आणि फी देण्याचा वेळ व रीत, हीं ठरविण्याचा,

अधिकार आहे.

(३) टपालाच्या जिनसा, "व्ह्याल्यू-पेएबल" ह्मणून पाठविण्याकरितां, पोस्ट आफिसच्या हवालीं दिल्या पाहिजेत, आणि याप्रमाणें पाठविल्या ह्मणजे त्या, डायरेक्टर जनरल हुकूम करून वेळोवेळीं नेमील त्या वेळीं व त्या रीतीनें स्वाधीन केल्या पाहिजेत.

इतर देशांशीं असणारी व्यवस्था अमलांत आणण्याचा अधिकार.

३६. (१) रजिस्टर केलेल्या, विमा उतरलेल्या किंवा व्ह्याल्यू-पेएबल टपालाच्या जिनसा, ब्रिटिश हिंदुस्थानाच्या आणि संयुक्त राज्य, कोणताही ब्रिटिश अमलाखालील मुलुक, देशी संस्थान किंवा परदेश यांच्या दर्म्यान, टपालानें पाठविण्याकरितां, जेथें संयुक्त राज्याशीं किंवा असा मुलुक, संस्थान किंवा देश याशीं कांहीं व्यवस्था असेल, तेथें गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस ती व्यवस्था अमलांत आणण्याकरितां कानू करण्याचा अधिकार आहे.

(२) विशेषेंकरून, व सदरील सामान्य अधिकारास बाध न येतां, अशा कानूंमध्यें—

(अ) सदरीं सांगितलेल्या प्रकारच्या टपालाच्या जिनसा पाठविणारांनीं करावयाच्या इकराराचा नमुना, आणि

(ब) त्यांबाबद घ्यावयाची फी,

ठरविण्याचा अधिकार आहे.

## बाब ७.

### न स्वाधीन केलेल्या टपालाच्या जिनसा.

न स्वाधीन केलेल्या टपालाच्या जिनसांची व्यवस्था करण्याबाबद कानू करण्याचा अधिकार.

३७. (१) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस, ज्या टपालाच्या जिनसा कोणत्याही कारणानें स्वाधीन करतां येत नसतील (ज्यांस यांत पुढें "न स्वाधीन केलेल्या" टपालाच्या जिनसा असें ह्मटलें आहे) त्यांची व्यवस्था करण्याबाबद कानू करण्याचा अधिकार आहे.

(२) विशेषेंकरून, व सदरील सामान्य अधिकारास बाध न येतां, अशा कानूंमध्यें—

(अ) कोणत्याही पोस्ट आफिसांतील न स्वाधीन केलेल्या टपालाच्या जिनसा त्या आफिसांत किती मुदतीपर्यंत राहिल्या पाहिजेत तें ठरविण्याचा, आणि

(ब) न स्वाधीन केलेल्या टपालाच्या जिनसा, किंवा कोणत्याहि वर्गाच्या न स्वाधीन केलेल्या टपालाच्या जिनसा, यांच्या यादी प्रसिद्ध करण्याबद्दल तजवीज करण्याचा,

अधिकार आहे.

(३) दरेक न स्वाधीन केलेली टपालाची जिन्नस, या कलमाच्या सदरील ठरावांअन्वयें केलेल्या कानूंत ठरविलेल्या मुदतीपर्यंत पोस्ट आफिसांत ठेऊन घेतल्यानंतर, ज्या पोस्ट आफिसांत ती घातलेली असेल त्या आफिसाकडे, पाठविणारास परत देण्याकरितां, जास्त हाशील न घेतां, रवाना केली पाहिजे, किंवा पोस्ट मास्तर जनरलच्या आफिसांत पाठविली पाहिजे.

पोस्ट मास्तर जनरलच्या आफिसांतील न स्वाधीन केलेल्या टपालाच्या जिनसांची व्यवस्था.

३८. (१) कलम ३७ याचें पोटकलम (३), याअन्वयें पोस्ट मास्तर जनरलच्या आफिसांत आलेल्या दरेक टपालाच्या जिनसेची व्यवस्था खालीलप्रमाणें केली पाहिजे:—

(अ) साधल्यास, तिजवर पुनः पत्ता लिहून ज्या मनुष्याचें नांव तिजवर असेल त्याकडे ती टपालानें रवाना केली पाहिजे, किंवा

(ब) सदरीं सांगितल्याप्रमाणें ती पुनः पत्ता लिहून पाठवितां येत नसल्यास, त्या कामासाठीं पोस्ट मास्तर जनरलनें नेमलेल्या व गुप्तता राखण्यास बांधलेल्या कोणत्या तरी अमलदारानें, पाठविणाराचें नांव व पत्ता समजण्याकरितां, ती उघडली पाहिजे.

(२) जर पाठविणाराचें नांव व पत्ता याप्रमाणें समजला, तर ती जिन्नस, जास्त हाशील न घेतां किंवा गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे कानू करून फर्मावितील तशा जास्त हाशिलास पात्र ठेवून, पाठविणाराकडे टपालानें परत पाठविली पाहिजे.

न स्वाधीन केलेल्या टपालाच्या जिनसांची अखेरची व्यवस्था.

३९. न स्वाधीन केलेल्या ज्या टपालाच्या जिनसांची व्यवस्था सदरील ठरावांअन्वयें करतां येत नसेल त्या, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं कानू करून कांहीं जास्त मुदत फर्मावित्यास त्या मुदतीपर्यंत पोस्ट मास्तर जनरलच्या आफिसांत ठेवून घेतल्या पाहिजेत, आणि ते याप्रमाणें फर्मावितील त्या रीतीनें त्यांची व्यवस्था केली पाहिजे:

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं—

(अ) पत्रांचा व पोस्ट-कार्डांचा नाश केला पाहिजे;

(ब) कोणत्याही न स्वाधीन केलेल्या टपालाच्या जिनसेंत मिळालेला पैसा किंवा लवकर नासून जाण्यासारखी नसणारी विकण्याजोगी मालमत्ता, हीं पोस्ट मास्तर जनरलच्या आफिसांत एका वर्षाच्या मुदतीपर्यंत ठेऊन घेतलीं पाहिजेत, आणि ती मुदत संपेपर्यंत त्यांवर कोणत्याही मनुष्यानें आपला हक्क शाबीत केला नाहीं तर, तो पैसा असल्यास पोस्ट आफिसच्या खातीं जमा केला पाहिजे, आणि ती विकण्याजोगी मालमत्ता असल्यास, ती विकून विकरीचें उत्पन्न पोस्ट आफिसच्या खातीं जमा केलें पाहिजे.

---

## बाब ८.

### तारवानें न्यावयाच्या पत्रांबाबद.

ब्रिटिश हिंदुस्थानांतील कोणत्याही बंदराहून निघणाऱ्या व मेलचें तारूं नसणाऱ्या तारवाच्या मास्तराचें मेलच्या थैल्या नेणें हें काम आहे.

४०. ब्रिटिश हिंदुस्थानांतील कोणत्याही बंदराहून ब्रिटिश हिंदुस्थानाच्याआंतल्या कोणत्याही बंदरास किंवा ब्रिटिश हिंदुस्थानापलीकडील कोणत्याही बंदरास किंवा जागेस जावयाच्या बेतांत असलेल्या मेलचें तारूं नाहीं अशा कोणत्याही तारवाच्या मास्तराला पोस्ट आफिसचा कोणताही अमलदार जी कोणतीही मेलची थैली न्यावयास

सांगेल, ती त्या मास्तरानें तारवावर घेतली पाहिजे, आणि गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे कायदा करून नमुना ठरवितील त्याप्रमाणें त्या थैलीबद्दल पावती देऊन, ती नेमलेल्या बंदरीं किंवा जागीं, विलंब लाविल्याशिवाय, स्वाधीन केली पाहिजे.

ब्रिटिश हिंदुस्थानांतील कोणत्याही बंदरीं येऊन पोहंचलेल्या तारवाच्या मास्तराचें, त्या तारवावर असलेल्या टपालाच्या जिनसा व मेलच्या थैल्या यांसंबंधानें काम.

४१. (१) ब्रिटिश हिंदुस्थानांतील कोणत्याही बंदरीं येऊन पोहंचलेल्या तारवाच्या मास्तरानें, विलंब लाविल्याशिवाय, त्या तारवावरील ज्या ज्या टपालाच्या जिनसेवर किंवा मेलच्या थैलीवर त्या बंदराचा पत्ता असून जी कलम ४ ह्याअन्वयें गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांस दिलेल्या अनन्यग्राह्याधिकाराखालीं येत असेल ती, त्या बंदरांतील पोस्ट आफिसांत किंवा या बाबतींत पोस्ट मास्तर जनरलानें पोस्ट आफिसच्या ज्या अमलदारास अधिकार दिलेला असेल त्याच्या स्वाधीन करविली पाहिजे.

(२) जर त्या तारवावर, ब्रिटिश हिंदुस्थानाच्याआंतील इतर कोणत्याही जागेचा पत्ता असलेली कोणतीही टपालाची जिन्नस किंवा मेलची थैली असून ती सदरीं सांगितलेल्या अनन्यग्राह्याधिकाराखालीं येत असेल, तर त्या तारवाच्या मास्तरानें ती गोष्ट, तें तारूं ज्या बंदरीं पोहंचलें असेल त्या बंदरांतील पोस्ट आफिसावरील अमलदारास, विलंब न लावितां, कळविली पाहिजे, आणि तो अमलदार त्याला सांगेल त्याप्रमाणें त्यानें वागलें पाहिजे; आणि अशा अमलदाराच्या पावतीवरून तो मास्तर त्या टपालाच्या जिनसेबाबदच्या किंवा मेलच्या थैलीबाबदच्या सर्व पुढच्या जबाबदारींतून मुक्त होईल.

मेलच्या तारवांखेरीज इतर तारवांनीं टपालाच्या जिनसा नेण्याबद्दल इनामाचा पैका देणें.

४२. गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस, इंडिया गॅझेटांत जाहिरनामा देऊन त्याच्याद्वारें, मेलचीं तारवें नाहींत अशा तारवांच्या मास्तरांस, पोस्ट आफिसच्यावतीनें नेण्याकरितां त्यांनीं घेतलेल्या टपालाच्या जिनसांबद्दल इनामाचा पैका किती द्यावयाचा तें ठरविण्याचा अधिकार आहे ; आणि मेलचें तारूं नाहीं असें जें कोणतेंही तारूं सदरीं सांगितल्याप्रमाणें ब्रिटिश हिंदुस्थानांतील कोणत्याही बंदराहून निघण्याच्या बेतांत असेल, त्याच्या मास्तरानें त्यावर मेलची थैली नेण्याकरितां घेतली तर त्याला, त्या मेलच्या थैलीसंबंधानें व तिच्याआंतील वस्तूंसंबंधानें या कलमाअन्वयें मिळावयाच्या इनामाच्या पैक्याची रकम ताबडतोब मागण्याचा व मिळण्याचा हक्क प्राप्त होईल.

---

## बाब ९.

### मनी आर्डरी.

मनी आर्डरींसाठीं तजवीज करण्यास व त्यांच्याद्वारें पैका पाठविण्यासंबंधानें कायदा करण्यास अधिकार.

४३. (१) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस, पैक्याच्या लहान लहान रकमा पोस्ट आफिसमार्फत मनी आर्डरींच्याद्वारें पाठविण्याबद्दल तजवीज करण्याचा आणि अशा मनीआर्डरींबाबद कायदा करण्याचा अधिकार आहे.

(२) विशेषेंकरून, व सदरील सामान्य अधिकारास बाध न येतां, अशा कायद्यांमध्यें—

(अ) ज्या रकमेपर्यंत मनी आर्डरी करतां येतील ती रकम,

(ब) ज्या मुदतीपर्यंत मनी आर्डरी चालू राहतील ती मुदत, आणि

(क) त्यावर किंवा त्यांच्या संबंधानें घ्यावयाच्या कमिशनचे दर किंवा फी,

ठरविण्याचा अधिकार आहे.

मनी आर्डर परत मागण्यास किंवा पैका द्यावयाचा त्याच्या नांवाच्याबदला दुसऱ्या कोणाचें नांव दाखल करण्यास, पैका पाठविणारास अधिकार.

४४. (१) मनी आर्डरीनें पोस्ट आफिसामार्फत पैका पाठविणाऱ्या मनुष्यास, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे कलम ४३ ह्याअन्वयें कायदा करून कमिशनचे जास्त दर किंवा जास्त फी घेण्याविषयीं किंवा इतर कोणत्याही बाबतींविषयीं ज्या शर्ती ठरवितील त्यांस पात्र राहून, असें सांगण्याचा अधिकार आहे कीं, त्या मनी आर्डरीची रकम ज्यास

द्यावयाची त्यास ती दिली नसली तर आपणास ती परत द्यावी किंवा ती मूळची ज्यास द्यावयाची त्यास ती न देतां दुसऱ्या अमुक मनुष्यास द्यावी.

(२) जर कोणत्याही मनी आर्डरीचा पैका ज्यास द्यावयाचा तो इसम आणि तो पैका पाठविणारा, ह्यांपैकीं कोणताही इसम सांपडला नाहीं आणि ती मनी आर्डर केल्याच्या तारखेपासून एका वर्षाच्या मुदतीच्याआंत, तो पैका ज्यास द्यावयाचा त्या इसमानें किंवा तो पाठविणारानें मागणी केली नाहीं तर, त्या मनी आर्डरीची रकम सरकारांतून मागतां येणार नाहीं.

पोस्टल आर्डरी करण्याबद्दल तजवीज करण्याचा अधिकार.

४५. गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस, सोईवार पडेल अशा नमुन्याप्रमाणें कांहीं ठरीव रकमांबद्दल मनी आर्डरी (ज्यांस पोस्टल आर्डरी किंवा योग्य वाटेल तें इतर नांव द्यावें) करण्यास अधिकार देण्याचा, आणि त्यांवर घ्यावयाच्या कमिशनच्या दरांसंबंधानें व त्या ज्या रीतीनें, व ज्या शर्तींस पात्र राहून, करतां, अदा करतां व रद्द करतां येतील त्या रीतीसंबंधानें व शर्तींसंबंधानें कानू करण्याचा अख्त्यार आहे :

मात्र इतकेंच कीं, अशी कोणतीही आर्डर दाहा रुपयांहून अधिक रकमेची करूं नये.

इतर देशांशीं असणारी व्यवस्था अमलांत आणण्यास अधिकार.

४६. (१) जेथें संयुक्त राज्यांशीं, किंवा कोणताही ब्रिटिश अमलाखालील मुलुक, देशी संस्थान किंवा परदेश यांशीं, ब्रिटिश हिंदुस्थानाच्या आणि संयुक्त राज्य किंवा असा मुलुक, संस्थान किंवा देश यांच्या दरम्यान पोस्ट आफिसामार्फत मनी आर्डरी करण्याबद्दल व अदा करण्याबद्दल कांहीं व्यवस्था असेल, तेथें ती अमलांत आणण्याकरितां कानू करण्याचा गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस अख्त्यार आहे.

(२) विशेषेंकरून, व सदरील सामान्य अधिकारास बाध न येतां, अशा कानूंमध्यें—

(अ) अशा मनी आर्डरी ब्रिटिश हिंदुस्थानांत ज्या रीतीनें, व ज्या शर्तींस पात्र राहून, करतां व अदा करतां येतील ती रीत व त्या शर्ती, आणि

(ब) त्यांवर घ्यावयाच्या कमिशनचे दर,

ठरविण्याचा अधिकार आहे.

भलत्याच मनुष्यास दिलेल्या मनी आर्डरीच्या रकमेचा वसूल.

४७. जर कोणताही मनुष्य, वाजवी सबब नसतां (अशी सबब शाबीत करण्याचा बोजा त्यावर राहील)—

(अ) मनीआर्डरीच्या संबंधानें त्याला द्यावयास पाहिजे होती तिच्याहून कोणतीही जास्त रकम पोस्ट आफिसच्या कोणा अमलदारानें तिच्यासंबंधानें त्यास दिली असेल, किंवा

(ब) मनीआर्डरीची जी रकम दुसऱ्या कोणत्या तरी मनुष्यास द्यावयास पाहिजे होती ती त्या मनुष्याला न देतां पोस्ट आफिसच्या कोणा अमलदारानें त्याला दिली असेल,

ती रकम परत देण्यास हयगय करील किंवा नाकारील,

तर ती रकम, पोस्ट मास्तर जनरलानें ह्या बाबतींत अधिकार दिलेल्या पोस्ट आफिसच्या अमलदारास, सदर्हू प्रकारें हयगय करणाऱ्या किंवा नाकारणाऱ्या मनुष्याकडून, ती त्याकडून येणें असणारी जमीन महसुलाची बाकी असल्याप्रमाणें, वसूल करतां येईल.

मनी आर्डरींसंबंधाच्या जबाबदारींतून मुक्तता.

४८. खालीं लिहिलेल्या कोणत्याही बाबतीच्या संबंधानें, सेक्रेटरी आफ् स्टेट फार इंडिया इन् कौन्सिल यांवर किंवा पोस्ट आफिसच्या कोणत्याही अमलदारावर कोणताही दावा करतां कामा नये किंवा इतर कायद्यासंबंधी काम चालवितां कामा नये :—

(अ) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांकडून ह्या बाबीअन्वयें करण्यांत आलेल्या कोणत्याही कानूअन्वयें केलेली कोणतीही गोष्ट; अगर

(ब) पैका पाठविणारानें, पैका ज्यास द्यावयाचा त्याच्या नांवासंबंधाची व पत्त्यासंबंधाची चुकीची किंवा अपुरी माहिती दिल्यावरून, मनी

आर्डरीचा पैका भलत्याच मनुष्यास देण्यांत येणें: मात्र त्या अपुऱ्या माहितीच्या बाबतींत, पैका ज्यास द्यावयाचा त्याची ओळख पटण्याला त्या माहितीचा तपशील पुरता होता असें ग्राह्य करण्यास वाजवी कारण असलें पाहिजे; अगर

(क) कोणतीही आकस्मिक हयगय, वर्जन अगर चुकी पोस्ट आफिसच्या कोणा अमलदारानें केल्यावरून अगर त्याच्या हातून घडल्यावरून, किंवा अशा अमलदाराचें कपट किंवा त्यानें जाणून बुजून केलेलें कृत्य किंवा कसूर शिवाय करून इतर कोणत्याही कारणावरून, कोणत्याही मनी आर्डरीची रकम देण्यास नाकारणें किंवा विलंब लागणें; किंवा

(ड) मनी आर्डर केल्याच्या तारिखेपासून एक वर्ष झाल्यांनंतर तिचा पैका कोणत्याही भलत्याच मनुष्यास देणें.

---

## बाब १०.

## शिक्षा व काम चालविण्याची रीत.

### पोस्ट आफिसच्या अमलदारांनीं केलेले अपराध.

४९. टपालांतून जात असलेली कोणतीही मेलची थैली किंवा कोणतीही टपालाची जिन्नस नेण्याच्या किंवा स्वाधीन करण्याच्या कामीं ज्या कोणत्याही मनुष्यास लाविलें असेल, तो जर— मेलच्या थैल्या किंवा टपालाच्या जिनसा नेण्याकरितां किंवा स्वाधीन करण्याकरितां लावलेल्या मनुष्याच्या गैरवर्तनाबद्दल शिक्षा.

(अ) अशा कामगिरीवर असतांना कैफी स्थितींत असेल, किंवा

(ब) सदरीं सांगितल्या प्रकारची कोणतीही मेलची थैली किंवा टपालाची जिन्नस हिच्या सुरक्षितपणास अपाय होण्यासारखा निष्काळजीपणा किंवा इतर गैरवर्तन केल्याचा दोषी होईल, किंवा

(क) सदरीं सांगितल्या प्रकारची कोणतीही मेलची थैली किंवा टपालाची जिन्नस नेण्यामध्यें किंवा स्वाधीन करण्यामध्यें गमेल किंवा विलंब लावील, किंवा

(ड) सदरीं सांगितल्या प्रकारची कोणतीही मेलची थैली किंवा टपालाची जिन्नस सुरक्षितपणें नेण्यासाठीं किंवा स्वाधीन करण्यासाठीं योग्य काळजी व मेहेनत घेणार नाहीं,

तर तो पराकाष्ठा पन्नास रुपयेपर्यंत दंडास पात्र होईल.

५०. टपालांतून जात असलेली कोणतीही मेलची थैली किंवा कोणतीही टपालाची जिन्नस नेण्याच्या किंवा स्वाधीन करण्याच्या कामीं लाविलेला जो कोणताही मनुष्य आपल्या हुद्याच्या कामावरून, परवानगीशिवाय किंवा आधीं एका महिन्याची लेखी नोटीस दिल्याशिवाय, आपखुशीनें दूर होईल, तो पराकाष्ठा एक महिन्यापर्यंत कैदेच्या शिक्षेस किंवा पराकाष्ठा पन्नास रुपयेपर्यंत दंडास किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र होईल. मेलच्या थैल्या किंवा टपालाच्या जिनसा नेण्याकरितां किंवा स्वाधीन करण्याकरितां लावलेल्या मनुष्यानें परवानगीशिवाय किंवा नोटीस दिल्याशिवाय आपखुशीनें कामावरून दूर होण्याबद्दल शिक्षा.

५१. जो मनुष्य टपालांतून जात असलेली कोणतीही टपालाची जिन्नस नेण्याच्या किंवा स्वाधीन करण्याच्या कामीं लाविलेला असून ज्यास ह्याप्रमाणें कामगिरीवर असतांना कोणतेंही रजिस्टर ठेवण्याविषयीं हुकुम असेल असा कोणताही मनुष्य, त्या रजिस्टरांत ज्या जागीं तो गेला नसेल त्या जागीं तो गेला होता अगर जी टपालाची जिन्नस त्यानें स्वाधीन केली नसेल ती त्यानें स्वाधीन केली होती असा विश्वास उत्पन्न करण्याच्या टपालाच्या जिनसा नेण्याकरितां किंवा स्वाधीन करण्याकरितां लावलेल्या मनुष्यानें ठेवलेल्या रजिस्टरांत खोटी नोंद करण्याबद्दल शिक्षा.

इरादानें कोणतीही खोटी नोंद करील, करवील किंवा करूं देईल, तो पराकाष्ठा सहा महिन्यांच्या मुदतीपर्यंत कैदेच्या शिक्षेस किंवा पराकाष्ठा शंभर रुपयेपर्यंत दंडास किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

टपालाच्या जिनसा चोरणें, त्यांचा लबाडीनें गैरशिस्त उपयोग करणें, त्या लपविणें, त्यांचा नाश करणें किंवा त्या फेंकून देणें याबद्दल शिक्षा.

९२. जो कोणी पोस्ट आफिसचा अमलदार असून, टपालांतून जात असलेली कोणतीही टपालाची जिन्नस किंवा तींत असलेली कोणतीही वस्तु चोरील, किंवा लबाडीनें तिचा गैरशिस्त उपयोग करील, किंवा कोणत्याही उद्देशानें ती लपवील, तिचा नाश करील किंवा ती फेंकून देईल, तो पराकाष्ठा सात वर्षांच्या मुदतीपर्यंत कैदेच्या शिक्षेस पात्र होईल, व तो दंडासही पात्र होईल.

टपालाच्या जिनसा उघडण्याबद्दल, अटकावण्याबद्दल किंवा खोळंबवण्याबद्दल शिक्षा.

९३. जो कोणी पोस्ट आफिसचा अमलदार असून, टपालांतून जात असलेली कोणतीही टपालाची जिन्नस, आपल्या कर्तव्याविरुद्ध, उघडील, उघडवील किंवा उघडूं देईल, अगर अशी जिन्नस जाणून बुजून अटकावील, अटकाववील किंवा अटकावूं देईल अगर खोळंबवील, तिचा खोळंबा करवील अगर खोळंबवूं देईल, तो पराकाष्ठा दोन वर्षांच्या मुदतीपर्यंत कैदेच्या शिक्षेस, किंवा दंडास, किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र होईल:

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, ह्या आक्टावरून मिळणाऱ्या अधिकाराअन्वयें किंवा गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या लेखी हुकुमावरून किंवा योग्य कोर्टानें फर्माविल्यावरून कोणतीही टपालाची जिन्नस उघडणें, अटकावून ठेवणें किंवा खोळंबवणें यास ह्या कलमांतील कोणताही मजकूर लागू होणार नाहीं.

आफिसच्या निशाण्यांच्या संबंधानें कपट करण्याबद्दल व फाजील टपाल हाशील घेण्याबद्दल शिक्षा.

९४. जो कोणी पोस्ट आफिसचा अमलदार असून,—

(अ) टपालाच्या जिनसेवर कपटानें कोणतीही खोटी आफिसची निशाणी करील, अगर

(ब) टपालाच्या जिनसेवर जी कोणतीही आफिसची निशाणी असेल ती कपटानें बदलील, काढून टाकील किंवा नाहींशी करील, अगर

(क) त्याला कोणतीही टपालाची जिन्नस स्वाधीन करण्यास सांगितलें असून तो या आक्टाअन्वयें घ्यावयाची नाहीं अशी पैक्याची कोणतीही रकम त्या जिनसेच्या टपाल हाशिलासंबंधानें जाणून बुजून मागेल किंवा घेईल,

तो पराकाष्ठा दोन वर्षांच्या मुदतीपर्यंत कैदेच्या शिक्षेस पात्र होईल, व तो दंडासही पात्र होईल.

पोस्ट आफिसचे दस्तऐवज कपटानें तयार करण्याबद्दल, फिरविण्याबद्दल किंवा लपाविण्याबद्दल किंवा त्यांचा नाश करण्याबद्दल शिक्षा.

९५. जो कोणी पोस्ट आफिसाचा अमलदार असून ज्याकडे कोणताही दस्तऐवज तयार करण्याचें किंवा ठेवण्याचें काम सोपलें असेल, त्यानें तो दस्तऐवज कपटानें चुकीचा तयार केला किंवा तो दस्तऐवज फिरविला किंवा लपवून ठेविला किंवा त्याचा नाश केला तर, तो पराकाष्ठा दोन वर्षांच्या मुदतीपर्यंत कैदेच्या शिक्षेस पात्र होईल, व तो दंडासही पात्र होईल.

हाशील न भरलेल्या टपालाच्या जिनसा कपटानें पाठविण्याबद्दल शिक्षा.

९६. जो कोणी पोस्ट आफिसचा अमलदार असून, ज्या कोणत्याही टपालाच्या जिनसेबद्दल ह्या आक्टांत ठरविलेल्या रीतीनें टपालहाशील दिलेलें किंवा घेतलेलें नाहीं, अशी जिन्नस, तिजवरील सरकारचें टपालहाशील कपटानें बुडविण्याच्या इरादानें, टपालानें पाठवील, अगर कोणत्याही मेलच्या थैलींत घालील, तो पराकाष्ठा दोन वर्षांच्या मुदतीपर्यंत कैदेच्या शिक्षेस पात्र होईल, व तो दंडासही पात्र होईल.

९७. (१) जो कोणी पोस्ट आफिसचा अमलदार असून, ब्रिटिश हिंदुस्थानच्या हद्दींबाहेरील हिंदुस्थानांतल्या ज्या कोणत्याही जागीं गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांनीं पोस्टें स्थापिलीं असतील त्या जागीं कामावर ठेविलेला असेल, किंवा अशा कोणत्याही जागीं टपालहाशिलाचे स्टांप विकण्यास नेमलेला असेल, त्यानें जर ह्या आक्टाअन्वयें शिक्षा करण्याजोगा अपराध त्या जागीं केला तर त्याबदल, तो अपराध ज्या जागीं करण्यांत आला तेथें, त्या जागीं केलेल्या अपराधांचा इन्साफ हातीं घेण्यास गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं योग्य रीतीनें अधिकार दिलेल्या कोणत्याही कोर्टास किंवा अंमलदारास, अगर तो अपराध ब्रिटिश हिंदुस्थानाच्या कोणत्याही भागांत केला असल्याप्रमाणें त्या भागांतील कोणत्याही योग्य अधिकाराच्या कोर्टास शिक्षा सांगतां येईल.

हिंदुस्थानांतपण ब्रिटिश हिंदुस्थानाबाहेर केलेल्या अपराधांबद्दल शिक्षा.

(२) सन १८९८ चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा याच्या १८८ व्या कलमाचे ठराव, या कलमांत उल्लेख केलेल्या कोणत्याही अपराधास लागू होणार नाहींत.

## इतर अपराध.

९८. (१) जो कोणी—

कलम ४ याविरुद्ध चालल्याबद्दल शिक्षा.

(अ) कलम ४ यांत गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस दिलेल्या अनन्यग्राह्याधिकाराखालीं येणारें पत्र टपालाखेरीज इतर रीतीनें नेईल, अगर

(ब) सदरीं सांगितलेल्या अनन्यग्राह्याधिकाराखालीं येणारें कोणतेंही पत्र टपालाखेरीज इतर रीतीनें नेण्याच्या संबंधाचें कोणतेंही आनुषंगिक काम करील, अगर

(क) सदरीं सांगितलेल्या अनन्यग्राह्याधिकाराखालीं येणारें पत्र टपालाखेरीज इतर रीतीनें पाठवील, किंवा पाठविण्यासाठीं देण्यास काढील किंवा स्वाधीन करील, अगर

(ड) सदरीं सांगितलेल्या अनन्यग्राह्याधिकारांतून खेरीज केलेलीं पत्रें, टपालाखेरीज इतर रीतीनें पाठविण्यासाठीं गोळा करील,

तो अशा दरेक पत्राबद्दल पराकाष्ठा पन्नास रुपयेपर्यंत दंडास पात्र होईल.

(२) कोणा मनुष्यावर ह्या कलमाखालीं येणारा अपराध केल्याच्या शाबितीचा ठराव अगोदर झालेला असून, त्यावर त्या कलमाअन्वयें पुनः तशा शाबितीचा ठराव होईल, तर तो, अशा पुढच्या शाबितीच्या दरेक प्रसंगीं, पराकाष्ठा पांचशें रुपयेपर्यंत दंडास पात्र होईल.

९९. (१) जो कोणी, ५ व्या कलमाच्या ठरावांविरुद्ध, पत्रें नेईल, घेईल, देण्यास काढील किंवा स्वाधीन करील, किंवा पत्रें गोळा करील, तो अशा दरेक पत्राबद्दल पराकाष्ठा पन्नास रुपयेपर्यंत दंडास पात्र होईल.

कलम ५ यांविरुद्ध चालल्याबद्दल शिक्षा.

(२) कोणा मनुष्यावर ह्या कलमाखालीं येणारा अपराध केल्याच्या शाबितीचा ठराव अगोदर झालेला असून, त्यावर त्या कलमाअन्वयें पुनः तशा शाबितीचा ठराव होईल, तर तो, अशा पुढच्या शाबितीच्या दरेक प्रसंगीं, पराकाष्ठा पांचशें रुपयेपर्यंत दंडास पात्र होईल.

६०. जो कोणी टपालहाशिलाचे स्टांप विकण्यास नेमलेला असून—

कलम १६ याअन्वयें केलेल्या कानूंचा भंग केल्याबद्दल शिक्षा.

(अ) कोणत्याही टपालहाशिलाच्या स्टांपाबद्दल अगर टपालहाशिलाच्या स्टांपांच्या जमावाबद्दल, कलम १६, पोटकलम (२), रकम (अ), ह्याअन्वयें केलेल्या कोणत्याही कानूंत ठरविलेल्या किंमतीहून जास्त किंम

कोणत्याही खरीददाराकडून घेईल, तो पराकाष्ठा सहा महिन्यांच्या मुदतीपर्यंत कैदेच्या शिक्षेस, किंवा पराकाष्ठा दोनशें रुपयेपर्यंत दंडास, किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र होईल; अगर

(ब) कलम १६ याअन्वयें केलेल्या इतर कोणत्याही कानूचा भंग करील, तो पराकाष्ठा दोनशें रुपयेपर्यंत दंडास पात्र होईल.

कलम १९ अगर २० याविरुद्ध चालल्याबद्दल शिक्षा.

६१. (१) जो कोणी कलम १९ अगर कलम २० ह्याच्या ठरावांविरुद्ध, कोणतीही टपालाची जिन्नस किंवा कोणतीही वस्तु टपालमार्फत पाठवील, किंवा पाठविण्यासाठीं द्यावयास काढील किंवा हवालीं करील, तो पराकाष्ठा एका वर्षाच्या मुदतीपर्यंत कैदेच्या शिक्षेस, किंवा दंडास, किंवा ह्या दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

(२) कोणतीही टपालची जिन्नस कलम १९ अगर कलम २० याच्या ठरावांविरुद्ध पाठविण्यांत आल्याकारणानें पोस्ट आफिसांत अटकावून ठेवण्यांत आली असतां तेवढ्यावरून, ती पाठविणारा, ती जिन्नस जर टपालाच्या योग्य क्रमाप्रमाणें स्वाधीन करण्यांत आली असती तर त्यावर जें काम चालविण्यांत आलें असतें त्या कामांतून सुटतो असें समजूं नये.

पत्रांच्या पेट्या खराब किंवा जायां करण्याबद्दल शिक्षा.

६२. जो कोणी, टपालाच्या जिनसा घालण्यासाठीं पोस्ट आफिसानें ज्या कोणत्याही पत्रांच्या पेटीची योजना केलेली असेल तींत किंवा तिला लागून कोणताही विस्तव, आगकाडी किंवा दिवा, कोणताही दारी, भयकारक, ओंगळ, अपकारक किंवा घातक पदार्थ, किंवा कोणताही पातळ पदार्थ ठेवील, किंवा अशा कोणत्याही पत्रांच्या पेटींत किंवा तिच्यावर पीडा [ लघवी वगैरे ] करील, किंवा अशी कोणतीही पत्रांची पेटी किंवा तिच्या संबंधाची किंवा तिच्यांतील वस्तु जायां होण्यासारखी कोणतीही गोष्ट करील, तो पराकाष्ठा एका वर्षाच्या मुदतीपर्यंत कैदेच्या शिक्षेस, किंवा दंडास, किंवा ह्या दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

पोस्ट आफिसला किंवा पोस्ट आफिसच्या पत्रांच्या पेटीला अधिकारावांचून कोणतीहि वस्तु किंवा रंग किंवा डांबर लावणें किंवा तें आफिस किंवा ती पेटी विरूप करणें याबद्दल शिक्षा.

६३. जो कोणी योग्य अधिकारावांचून, कोणत्याही पोस्ट आफिसांत किंवा त्यावर, अगर पोस्ट आफिसानें टपालाच्या जिनसा घालण्यासाठीं जिची योजना केलेली आहे अशा कोणत्याही पत्रांच्या पेटींत किंवा तिच्यावर, कोणतीही प्लाकार्ड, जाहिरात, नोटीस, यादी, दस्तऐवज, फळी किंवा इतर वस्तु लावील, किंवा अशा आफिसास किंवा पेटीस रंग किंवा डांबर लावील किंवा तें आफिस किंवा पेटी कोणत्याही रीतीनें विरूप करील, तो पराकाष्ठा पन्नास रुपयेपर्यंत दंडास पात्र होईल.

खोटा इकरार करण्याबद्दल शिक्षा.

६४. ज्या कोणत्याही मनुष्यास, टपालमार्फत पाठवावयाच्या कोणत्याही टपालाच्या जिनसेसंबंधानें किंवा तींत असलेल्या वस्तूंसंबंधानें किंवा तिच्या किंमतीसंबंधानें ह्या आक्टाअन्वयें इकरार करणें जरूर असेल, त्यानें जर आपल्या इकरारांत, जी गोष्ट खोटी असल्याबद्दल त्याला माहिती आहे किंवा खोटी मानण्यास त्यास कारण आहे, किंवा खरी आहे असें तो मानीत नाहीं, अशी कोणतीही गोष्ट दाखल केली तर तो पराकाष्ठा दोनशें रुपयेपर्यंत दंडास पात्र होईल, आणि तो खोटा इकरार जर सरकाराशीं कपट करण्यासाठीं केलेला असला, तर पांचशें रुपयेपर्यंत दंडास पात्र होईल.

कलम ४० अगर ४१ याच्या ठरावांप्रमाणें वागण्यास चुकल्याबद्दल तारवाच्या मास्तरास शिक्षा.

६५. जो कोणी तारवाचा मास्तर असून,—

(अ) कलम ४० यांतील ठरावांबरहुकुम वागण्यास चुकेल, अगर

(ब) वाजवी सबबीशिवाय (अशी सबब शाबीत करण्याचा बोजा त्यावर राहील), कलम ४१ यांत सांगितल्याप्रमाणें, कोणतीही टपालाची जिन्नस अगर मेलची थैली स्वाधीन करण्यास किंवा तारूं ज्या बंदरीं येऊन पोहंचलें असेल तेथील पोष्ट आफिसावरील अमलदाराच्या सांगण्याप्रमाणें वागण्यास चुकेल,

तो पराकाष्ठा एक हजार रुपयेपर्यंत दंडास पात्र होईल.

६६. (१) ब्रिटिश हिंदुस्थानांतील कोणत्याही बंदरीं येऊन पोहंचलेल्या कोणत्याही तारवावरील टपालाच्या जिनसा किंवा त्यांपैकीं कोणत्याही जिनसा त्या बंदरच्या पोस्ट आफिसांत पाठविण्यांत आल्यानंतर, त्या तारवाचा मास्तर किंवा त्यावरील कोणताही मनुष्य, कलम ४ ह्याअन्वयें गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस दिलेल्या अनन्यग्राह्याधिकारांतील कोणतीही टपालाची जिन्नस आपल्या सामानांत किंवा कबज्यांत किंवा हवालीं जाणूनबुजून ठेवील, तो सदरहू प्रकारच्या दरेक टपालाच्या जिनसेबद्दल पराकाष्ठा पन्नास रुपयेपर्यंत दंडास पात्र होईल.

बंदरांत येऊन पोहंचलेल्या तारवावर पत्रें मागें ठेवल्याबद्दल शिक्षा.

(२) जो कोणताही सदरहू प्रकारचा मास्तर किंवा इतर मनुष्य, सदरहू प्रकारची कोणतीही टपालाची जिन्नस, ती पोस्ट आफिसच्या कोणत्याही अमलदाराकडून मागण्यांत आल्यानंतर, ठेवून घेईल, तो अशा दरेक टपालाच्या जिनसेबद्दल पराकाष्ठा शंभर रुपयेपर्यंत दंडास पात्र होईल.

६७. जो कोणताही मनुष्य, या आक्टाअन्वयें अधिकार नसतां किंवा गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा लेखी हुकूम नसतां किंवा योग्य अधिकार असणाऱ्या कोर्टाचा हुकुम नसतां मेल किंवा टपालांतून जात असलेली कोणतीही टपालाची जिनस अटकावून ठेवील किंवा टपालांतून जात असलेली कोणतीही मेलची थैली कोणत्याही निमित्तानें उघडील, तो पराकाष्ठा दोनशें रुपयेपर्यंत दंडास पात्र होईलः

मेल अटकावून ठेवण्याबद्दल किंवा मेलची थैली उघडण्याबद्दल शिक्षा.

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, मेल किंवा टपालांतून जात असलेली टपालाची कोणतीही जिन्नस नेत असलेल्या पोस्ट आफिसच्या कोणत्याहि अमलदारास, सन१८९८ चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयीं कायदा किंवा त्या त्या वेळीं अमलांत असलेला इतर कोणताही कायदा याअन्वयें काग्निझेबल ह्मणून ठरविलेला कोणताहि अपराध केल्याच्या आरोपावरून अटकावून ठेवण्यास या कलमांतील कोणत्याही ठरावावरून व्यत्यय येईल असें समजूं नये.

६८. जो कोणताही मनुष्य, टपालांतून जात असलेली जी कोणतीही टपालाची जिन्नस इतर कोणत्याही मनुष्याच्या स्वाधीन केली पाहिजे होती ती जिन्नस, किंवा टपालाची जिन्नस जींत आहे अशी मेलची थैली कपटानें ठेवून घेईल, किंवा जाणूनबुजून लपवील, किंवा लांबवील, किंवा ठेवील किंवा अटकावील, किंवा पोस्ट आफिसच्या कोणत्याहि अमलदारानें सांगितल्यावर स्वाधीन करण्यास हयगय करील अगर नाकारील, तो पराकाष्ठा दोन वर्षांच्या मुदतीपर्यंत कैदेच्या शिक्षेस पात्र होईल, व तो दंडासही पात्र होईल.

चुकीनें देण्यांत आलेल्या टपालच्या जिनसा किंवा मेलच्या थैल्या ठेऊन घेण्याबद्दल शिक्षा.

६९. पोस्ट आफिसचा अमलदार नाहीं असा जो कोणताही मनुष्य जाणूनबुजून व दुष्टबुद्धीनें, कोणत्याही मनुष्याचें नुकसान करण्यासाठीं, जें कोणतेंही पत्र स्वाधीन करावयाचें असेल तें फोडील किंवा फोडवील किंवा ज्या कृत्याच्यायोगें पत्र योग्य रीतीनें अशा इतर मनुष्याच्या स्वाधीन होणार नाहीं किंवा होण्यास अडचण पडेल असें कोणतेंही कृत्य करील, तो पराकाष्ठा सहा महिन्यांच्या मुदतीपर्यंत कैदेच्या शिक्षेस किंवा पांचशें रुपयेपर्यंत दंडास, किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र होईलः

पत्रांवर ज्यांचा पत्ता लिहिला असेल त्यांस तीं न पोहंचत असें बेकायदेशीर रीतीनें करण्याबद्दल शिक्षा.

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, ज्या कृत्यास हें कलम लागू आहे असें कोणतेंही कृत्य ज्या मनुष्यानें केलें तो जर, पत्रावर ज्याचा पत्ता असून जो अल्पवयी किंवा वार्ड आहे त्याच्या आईबापांपैकीं कोणी असेल किंवा आईबापांच्या अगर पालनकरणाराच्या स्थानीं असेल, तर त्या मनुष्यास ह्या कलमांतील कोणताही ठराव लागू होणार नाहीं.

### सामान्य.

*ह्या आक्टाखालील अपराध करण्याच्या कामीं साह्य करण्याबद्दल किंवा ते अपराध करण्याचा प्रयत्न करण्याबद्दल शिक्षा.*

७०. जो कोणताही मनुष्य, ह्या आक्टाअन्वयें शिक्षेस पात्र असा कोणताही अपराध करण्याच्या कामीं साह्य करील किंवा याप्रमाणें शिक्षेस पात्र असणारा कोणताही अपराध करण्याचा प्रयत्न करील, तो त्या अपराधाबद्दल ठरविलेल्या शिक्षेस पात्र होईल.

*अपराधांच्या खटल्यांत, स्वामित्व पोस्ट ऑफिसचें आहे म्हणून दाखल करावें.*

७१. टपालानें पाठविलेल्या कोणत्याही मेलच्या थैलीसंबंधानें अगर टपालाच्या जिनसेसंबंधानें केलेल्या अपराधाबद्दलच्या प्रत्येक फिर्यादींत, त्या मेलच्या थैलीच किंवा टपालाच्या जिनसेचें स्वामित्व पोस्ट आफिसचें आहे असें लिहून देणें चार्जाच्या कारणासाठीं पुरेसें होईल; आणि ती मेलची थैली किंवा टपालाची जिनस कोणत्याही मोलाची होती असें सिद्ध करण्याची जरूरी नाहीं.

*ह्या आक्टाच्या कित्येक कलमांअन्वयें फिर्याद करण्याचा अधिकार.*

७२. ह्या आक्टाचीं कलमें ५१, ५३, ५४, रकमा (अ) व (ब), ५५, ५६, ५८, ५९, ६१. ६४, ६५, ६६ व ६७ यांच्या कोणत्याही ठरावाअन्वयें शिक्षा होण्यास पात्र असा कोणत्याही अपराधाचा इनसाफ डायरेक्टर जनरलच्या किंवा पोस्ट मास्तर जनरलच्या हुकुमावरून, किंवा त्याकडून मिळालेल्या अधिकाराअन्वयें फिर्याद झाल्याशिवाय, कोणत्याही कोर्टानें हातीं घेऊं नये.

---

## बाब ११.

### पुरवणीचे ठराव.

*जमीनदारी व इतर डिस्ट्रिक्ट पोस्टें.*

७३. (१) कोणत्याही जमीनदारी अगर इतर डिस्ट्रिक्ट पोस्टाच्या व्यवस्थेसाठीं कानू करण्याचा गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस अखत्यार आहे.

(२) विशेषेंकरून, व सदरील सामान्य अधिकारास बाध न येतां अशा कानूंमध्यें, ह्या आक्टाचे कोणते भाग जमीनदारी व इतर डिस्ट्रिक्ट पोस्टास आणि त्यासंबंधानें कामावर ठेविलेल्या माणसांस लागू होतील याबद्दल ठरविण्याचा अखत्यार आहे.

*ह्या आक्टाखालील कानूसंबंधानें कानू व ठराव करण्यास सामान्य अधिकार.*

७४. (१) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस यापूर्वी दिलेल्या अधिकाराखेरीज आणखी, ह्या आक्टाचे कोणतेही हेतु व उद्देश सिद्धीस नेण्यासाठीं कानू करण्याचाही अधिकार आहे.

(२) ह्या आक्टाअन्वयें करावयाच्या कोणत्याही कानूंत गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस असें फर्माविण्याचा अधिकार आहे कीं, त्या कानूचा भंग केला तर त्याबद्दल पन्नास रुपयेपर्यंत दंड होईल.

(३) ह्या आक्टाअन्वयें गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं केलेल्या सर्व कानू इंडिया गॅझेटांत प्रसिद्ध केल्या पाहिजेत, आणि त्या ह्याप्रमाणें प्रसिद्ध करण्यांत आल्या म्हणजे, त्या ह्या आक्टांतच ठरविल्याप्रमाणें त्यांचा अमल होईल.

*कानू करण्याचा अधिकार शिवाय करून इतर अधिकार डायरेक्टर जनरल यांकडे सोंपविण्याचा अधिकार.*

७५. गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे इंडिया गॅझेटांत जाहिरनामा देऊन त्याच्याद्वारें, त्यांना ह्या आक्टांत जे अधिकार दिलेले आहेत त्यांपैकीं कानू करण्याचा अधिकार शिवाय करून इतर कोणतेही अधिकार चालविण्याचा अखत्यार शर्तीशिवाय किंवा शर्तीनिशीं डायरेक्टर जनरल यांस देऊं शकतील.

*रद्द करणें.*

७६. दुसऱ्या परिशिष्टांत सांगितलेले कायदे त्याच्या चवथ्या कोष्टकांत निर्दिष्ट केलें आहे तेथवर रद्द केले आहेत.

*बचाव.*

७७. ह्या आक्टांतील कोणत्याही ठरावावरून, सन १७८० चा ईस्ट इंडिया कंपनीविषयींचा आक्ट किंवा तो आक्ट सुधारणारा किंवा लागू करणारा कोणताही कायदा, याच्या ठरावास कमीपणा किंवा बाध येईल असें समजूं नये.

## पहिलें परिशिष्ट.

### देशांतील टपालहाशिलाचे दर.

( कलम ७ पहा. )

**पत्रें.**

अर्ध्या तोळ्याहून जास्त वजन नसेल तर ... ... ... ... ... अर्धा आणा.
एका तोळ्याहून जास्त वजन नसेल तर ... ... ... ... ... एक आणा.
एका तोळ्याहून जास्त असलेल्या दरेक तोळयाबद्दल किंवा त्याच्या अंशाबद्दल ... एक आणा.

**पोस्ट कार्डो.**

एकेरी ... ... ... ... ... ... ... ... पाव आणा.
रिझाय [जबाबाच्या] ... ... ... ... ... ... ... अर्धा आणा.

**बुकांचीं व नमुन्याचीं प्याकेटें.**

दर दहा तोळ्यांबद्दल किंवा दहा तोळ्यांच्या अंशाबद्दल ... ... ... अर्धा आणा.

**वर्तमानपत्रें.**

तीन तोळ्यांहून जास्त वजन नसेल तर ... ... ... ... ... पाव आणा.

**रजिस्टर केलेलीं वर्तमानपत्रें.**

वीस तोळ्यांहून जास्त वजन नसेल तर .... ... ... ... ... अर्धा आणा.
वीस तोळ्यांहून जास्त असलेल्या दरेक वीस तोळ्यांबद्दल अगर वीस तोळ्यांच्या अंशाबद्दल. अर्धा आणा.

**पार्सलें.**

वीस तोळ्यांहून जास्त वजन नसेल तर ... ... ... ... ... दोन आणे.
चाळीस तोळ्यांहून जास्त वजन नसेल तर... ... ... ... ... चार आणे.
चाळीस तोळ्यांहून जास्त असलेल्या दरेक चाळीस तोळ्यांबद्दल अगर चाळीस तोळ्यांच्या अंशाबद्दल ... ... ... ... ... ... ... चार आणे.

## दुसरें परिशिष्ट.

### कायदे रद्द केले ते.

( कलम ७६ पहा. )

| वर्ष. | नंबर. | लहान सरनामा. | किती रद्द केला तें. |
|---|---|---|---|
| १८६६ | १४ | सन १८६६ चा हिंदुस्थानचा पोस्ट आफिसाचा आक्ट. | सगळा. |
| १८८२ | ३ | सन १८८२ चा दंगेखोर लेखांविषयींचा आक्ट. | रद्द केलेला नाहीं तितका सगळा. |
| १८९१ | १ | सन १८९१ चा हिंदुस्थानचा फौजदारी कायदा सुधारण्याबाबद आक्ट. | कलम ७. |
| १८९६ | १६ | सन १८९६ चा, हिंदुस्थानचा पोस्ट आफिसाचा आक्ट (१८६६) सुधारण्याबाबद आक्ट. | सगळा. |
| १८९७ | १४ | सन १८९७ चा हिंदुस्थानचा लहान सरनाम्यांबाबद आक्ट. | जेवढा सन १८९६ चा आक्ट १६ बाबाबद आहे तेवढा. |

जे. एम्. म्याकफर्सन,
सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.

(True translation)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.